।। ज्ञानम् सर्वजण हिताय ।।

मासिक

# शिक्षण यात्री

■ वर्ष:३ रे ■ अंक: ९ वा ■ मार्च २०१९ ■ किंमत:३० रूपये



## आई
### विशेषांक ...

नास्ति मातृसमा छाया नास्ति मातृसमा गति:।
नास्ति मातृसमा त्राण नास्ति मातृसमा प्रिया ।।

शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित

# जयश्रीबेन अमरिशभाई पटेल स्कूल

(सी.बी.एस.ई. प्रस्तावित),

वाघाडी

ता. शिरपूर जि. धुळे

**आपल्या पाल्याच्या सर्वांगीण विकासासाठी आजच प्रवेश घ्या...**



**बुद्धिमत्तेला** चालना

**नेतृत्व** घडवितो

**भविष्य** घडवितो

# प्रवेश सुरू

**२०१९-२०**

नर्सरी, ज्युनिअर केजी, सिनिअर केजी, आणि १ ली.









## उपलब्ध सुविधा

- प्रशिक्षित व अनुभवी शिक्षक वृंद.
- कॉम्प्युटर लॅब.
- आधुनिक स्मार्ट बोर्ड.
- प्रशस्त हवेशीर व अत्याधुनिक वर्ग.
- संगीत, नृत्य, नाटक प्रशिक्षक.
- खेळासाठी खुले मैदान व अनुभवी प्रशिक्षक.
- इनडोअर व आऊटडोअर असे नाविण्यपूर्ण खेळ.
- शारीरिक, बौद्धिक, सामाजिक आणि मानसिक विकासावर लक्ष.


संपर्क

जयश्रीबेन अमरिशभाई पटेल स्कूल (सी.बी.एस.ई. प्रस्तावित),
वाघाडी ता. शिरपूर जि. धुळे
संपर्क : ०२५६३-२५१००५, ९४०५९४६२९८, ९९२१०८७९११
ईमेल : rcpatelcbsewaghadi@gmail.com

शिक्षकांचे हक्काचे व्यासपीठ
वर्ष : ३ रे
अंक: ९ वा मार्च २०१९

• सह संपादक •
सुभाषदादा कुलकर्णी

• संपादन सहाय्य •
संदेश नंदकिशोर हजारे
प्रा.अनिल जाधव शिरपूरकर

• मांडणी •
प्रगती आर्टस्,शिरपूर ९४२२२३३२९४

• संपर्क •
शिक्षणयात्री
क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे
चलभाष : 8208301001
shikshanyatri11@gmail.com

कायदेशीर सल्लागार ...
ॲड.शाम पाटील

लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी

पी.आर.बी.ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्यकारी संपादकांवर.

संवादकीय...

# आई समजून घेतांना...



डॉ.पायल दंदे
अतिथी संपादक
(महिला दिन विशेषांक)

'आठ मार्च ' महिला दिवस. जगभरात नारीशक्तीचा जागर मांडत महिलांच्या संघर्षाचा, हिंमतीचा, अन्याया विरूद्ध लढण्याचा आणि आपला मौलीक हक्क मिळवण्याचा प्रतिक असलेला हा दिवस. 'अबला' नाही तर 'सबला' आहे हे दर्शवत स्वाभिमानाने जगण्याचा संदेश समस्त समाजात या निमित्ताने दिला नसतो.

म्हणूनच सर्वप्रथम नारी शक्तीला सलाम करित महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

स्त्री शक्तीचे दर्शन महिलेच्या विविध रूपातून घडते. आई-बहिण-पत्नी. मात्र विविध रूपे धारण करणारी महिला 'आई' या रूपात अधिक खुलते. मानव जन्माची सृजनकर्ता आहे. सर्जन शीलतेच्या नैसर्गिक शक्तीच्या जोरावर मानवाला जन्म देवून नव्या जगाची ओळख घडवणारी 'आई'. या आईचे वर्णन करणे, तिला शब्दात मांडणे अशक्यच नव्हे तर खूप कठीणच. 'ममता', 'प्रेम', 'वात्सल्य' या शब्दांचे अस्तित्व जाणवते ते केवळ 'आई' मुळेच.

नास्ति मातृसमा छाया
नास्ति मातृसमा गतिः।
नास्ति मातृसमा त्राण
नास्ति मातृसमा प्रिया ।।

या संस्कृत सुभाषिताचा अर्थ पुढीलप्रमाणे- आईसारखी कोणती सावली नाही, कोणता सहारा नाही, कोणताच रक्षक नाही नि कोणतीही प्रिय व्यक्ती नाही.

मुलांसाठी सतत धडपडणारी, त्यांची काळजी करणारी व कायम पाठीशी रहाणारी 'आई' आपण सार्‍यांनीच अनुभवलीय. तिच्या सावलीच्या आधारातच आजही वावरतोय, मोठे असलो तरीही...असे म्हणतात की देवाला सर्वांकडे लक्ष देणे शक्य नव्हते म्हणून त्याने 'आईची'

टिप : शैक्षणिक लेख,विचार,अनूभव,तसेच स्वरचित कथा कविता पाठवावयाचे असल्यास शिक्षणयात्री shikshanyatri11@mail.com या मेलवर पाठवावा. सोबत स्वतःचे नांव,पत्ता,शाळा,पासपोर्ट साईज फोटो पाठवावा. वर्गणी चेक/डि.डी./मनीऑर्डर 'शिक्षणयात्री' या नावाने संपर्क पत्यावर पाठवावे.

रचना केली. गरोदर पणापासून बाळंतपणापर्यंत-मुलाच्या संगोपणापासून त्याला स्वत:च्या पायावर उभे करण्यापर्यंत कष्ट करणारी ‘आई’ च्या अनेक रूपांचा साक्षात्कार व्हावा म्हणूनच आम्ही ८ मार्च जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आई मांडण्याचा प्रयत्न करित आहोत.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कुटूंबातून आलेल्या हेमंतबेन रसिकलाल पटेल यांच्या ममत्त्वाची ओळख करून देताहेत त्यांच्या सुनबाई जयश्रीबेन पटेल. आपल्या आईतुल्य सासू संस्काराच्या बळावर साऱ्यांच्या ‘मम्मीजी’ ठरतांना त्यांचे स्वभावपैलू, उलगडून दाखवतांना स्वत:च्या कुटूंबाला सांभाळतांनाच इतरांचे भले करणाऱ्या धार्मिक, संवेदनशील, संस्कारी व परोपकारी ‘मम्मीजीं’ च्या रूपान समर्थ नारी चे दर्शन घडवले आहे.

माजी विभागीय आयुक्त पुरूषोत्तम भापकर यांच्या आईंच्या अंगी असलेल्या कष्टाच्या शिदोरीने मुलांना उच्च शिक्षण दिले. लहानगा सुरेश म्हणजेच पुरूषोत्तम जिल्हाधिकारी-सीईओ-आयुक्त पदावर पोहचून कर्तृत्ववान अधिकारी घडवण्यामागे ‘ केशरबाई ’च्या कष्टाची माहिती त्यांच्या लेखातून होते.

सोळा बाळंतपण झेललेली , पैकी सात अपत्य वारले, त्यात नऊ जणांना जगवणारी यमुनाबाई. या आई ने किती दु:ख पचवत कुटूंबाला आकार दिला हे मांडलेय पी.व्ही.डी.टी. महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्य मीना कुटे यांनी. नेहमीच लेकुरवाळी राहिलेल्या आईने स्वत:च्या नातवंडाचाही सांभाळ केला. आणि उच्चशिक्षित मुलाच्या शिक्षणात परिस्थितीचा अडसर येऊ दिला नाही. गरिबीने संसार स्वाभिमानाने कसा करावा याचा धडा डॉ.मीना कुटे यांच्या आई शिकवतात.

नाशिक विभागाच्या माहिती कार्यालयाच्या संचालिका अर्चना देशमुख यांच्यासाठी आई म्हणजे साक्षात शक्तीचे प्रतिरूप. अखंड उर्जेचा प्रवाह. तरूण वयात मुलगा गेल्याच दु:ख पेलत जिद्दीने उभी राहणारी, वयाच्या छपन्नाव्या वर्षी बी.एस्सी.ची पदवी घेणारी ‘ आई ’ समजूण घेणे कठीणच.

मंत्रालयात कार्यरत तृप्ती पवारांना आईमध्ये निरनिराळी रूपे दिसतात. वडिलांच्या नोकरीचा बाऊ न करता स्वत: शेती कसणाऱ्या त्यांच्या आई उत्कृष्ट शेतकरी होत्या. उत्तम गृहिणी होत्या. विशेष म्हणजे आहे त्यात समाधानी होत्या. म्हणून त्यांच्या शब्दात आई म्हणजेच आत्म्यापासून ईश्वरांपर्यंत प्रेम करणारी व्यक्ती.

प्रा.रजनी लुंगसे यांच्या ‘आई समजून घेतांना’ या उत्तम कांबळे यांच्या समीक्षणात्मक लेखातून त्यांचे आत्मकथन वाचण्याचा नि आई समजून घेण्याचा प्रयत्न तरी करून बघावा ही आंतरिक तळमळ निर्माण झाली.

तसेच या महिला दिनाच्या निमित्ताने ’आई’ विशेषांकातून महिलांसाठीचे कायदे, योजना, महत्त्वाची माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

‘ शिक्षणयात्री’ मासिकाचा विशेष अंक सगळ्या आईंना समर्पित करते. आणि यत्र नार्यस्तु पुजन्ते... रमन्ते तत्र देवत: ... या संस्कृत सुभाषिता प्रमाणे समस्त महिला वर्गाला शुभेच्छा देते.

(प्रा.डॉ.पायल दंदे या एस.व्ही.के.एम., एन.एम.आय.एम.एस.विद्यापीठाअंतर्गत शिरपूर कॅम्पस येथे फार्माकोलॉजी या विषयात विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. payal.dande@gmail.com )

**सहकार्याचे विनम्र आवाहन...**

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता शिक्षण यात्री मासिकास जाहिरात, देणगी, वर्गणी देवून आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

द्विवार्षिक वर्गणी – ७०० रूपये त्रैवार्षिक वर्गणी–. १००० रूपये शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी–– खाते नाव–शिक्षणयात्री Shikshanyatri विजया बँक (राष्ट्रीय कृत) No--
512700301000129 Ifsc-VIJB0005127



# नास्ति मातृसमा छाया



**सौ.जयश्रीबेन अमरीशभाई पटेल**
नगराध्यक्षा
शिरपूर वरवाडे नगरपरिषद,शिरपूर

**सर्वप्रथम  सर्व महिलांना 'सशक्त नारी-समर्थ नारी' शुभेच्छा . या अंकात आपणास घडवणाऱ्या आईबद्दल लिहायचे असले तरी मी मात्र माझ्या सासुबाईंबद्दल लिहतेय. असे का? हा प्रश्न आपसुकच निर्माण होतो.**

**माझ्या सासुबाईंना अर्थात हेमंतबेन रसिकलाल पटेल यांना सारेजचण 'मम्मीजी' म्हणून संबोधतात. आम्ही घरातील, सारेचजण आप्तेष्ट देखील 'मम्मीजी' म्हणूनच हाक मारतो. त्या आईच्या रूपातील 'मम्मीजी' आहेत. आईची ममता,प्रेम त्यांच्या ठायी आहे. सुना म्हणून जरी या कुटूंबात असलो तरी आजपावेतो मम्मीजींनी मुलीप्रमाणेच काळजी घेतली. सख्ख्या आईच्या रूपातील सासू मिळणे महिलांसाठी भाग्याचे ! मम्मीजींसारख्या सासु मिळाल्या म्हणून आम्ही भाग्यशाली ठरतो. म्हणूनच या मम्मीजींबद्दल लिहावेसे वाटले.**

शिरपूर करांच्या 'मम्मीजी' उर्फ हेमंतबेन रसिकलाल पटेल यांचा आदर्श माता म्हणून उल्लेख करतांना मम्मीजींचे नाव हमखास घ्यावे लागेल. संस्कारांच्या बळावर काय करता येऊ शकते याचे उत्तम उदाहरण मम्मीजींनी घालून दिले आहे.महिला म्हणून घर सांभाळतांना विशेषत: व्यापार उदीम सांभाळणाऱ्या पतीला मदत करीत केलेला प्रवास हा प्रेरणादायी ठरतो.

संस्कारांच्या बळावर पुत्रांनी केलेली प्रगती नेत्रदिपक ठरते.आजही त्रिलोकात सन्मानाने आदराने मुलांची नावे घेतली जातात हे पाहून मातेला कोण सद्गत होत असेल ! आपण केलेल्या पुण्याईचे फळ 'याचि देही याचि डोळा' पहायला मिळाल्यांचे समाधान मम्मीजींना नक्कीच होत असेल.

मम्मीजी या मुळच्या गुजरात राज्यातील नडियाद येथील.या राज्यातील पोलादी पुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कुटूंबातील त्या सदस्य. त्यांचा जन्म स्वातंत्र्य प्राप्ती पुर्वी १९३३ सालचा. वडील सोमाभाई पटेल व त्यांचे कुटूंब सधन म्हणण्यापेक्षा गर्भश्रीमंत. व्यापार क्षेत्रातील बडे प्रस्थच म्हणावे लागेल. मम्मीजी मिळुन तीन बहिणी दोन भाऊ घरात शिक्षणाला पूरक वातावरण होते. मुलांनाही शिक्षणाची आस होती. मुलींना शिक्षण नको, शिकुन काय होणार? असे मानणारा एक वर्ग तर मुली शिकल्या पाहिजेत असा हट्ट बाळगणारा दुसरा वर्ग. सर्व भावंडे शिकली. त्या काळी शिक्षणाचा आजच्या एवढा प्रसार नव्हता. सरकारी शाळा असायच्या. ख्रिश्चन मिशनरी इंग्रजी माध्यमाच्या शाळा होत्या. मम्मीजींचे नाव इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दाखल करण्यात आले. सर्व भावंडात मम्मीजी सर्वात लहान. अनायसेच घरातील सर्वांच्या आवडत्या असल्याने सर्व हट्ट पुरवले जायचे. शिक्षणाबरोबर घरात धार्मिक वातावरण होतो. आंबाजी माता हे श्रद्धास्थान. पूजा अर्चा पाठोपाठ संस्कारांचे धडेही मिळायचे. 'अतिथी देवो भव' प्रमाणे आलेल्यास मदत करण्याचा स्वभाव मम्मीजींच्या अंगी बाणला गेला. मम्मीजी सातवी-आठवी पर्यंत शिकल्या. भावांनी उच्च शिक्षण घेत परदेशवारी केली. मोठे भाऊ कॅनडातील न्यायालयात न्यायाधीश होते. पुढे जाऊन

सर्व कुटूंब कॅनडावासी झाले. मम्मीजीं देखील १५ व्या वर्षाच लग्नाच्या बेडीत अडकल्या.

मम्मीजींचा विवाह १९४९ दरम्यान सुजित्रा (जिल्हा आनंद-गुजरात) या गावातील बडे व्यापारी रसिकलाल चुनिलाल पटेल यांच्याशी झाला. रसिकलाल उर्फ पप्पाजी हे पेट्रोलियम क्षेत्रातील व्यापार करीत. सधन कुटूंबापैकी एक कुटूंब. पप्पाजींचे दोन्ही भाऊ देखील हाच व्यापार सांभाळीत व्याप मोठा असल्याने तिन्ही भावांनी व्यापाराची ठिकाणे वाटून घेतली. पप्पाजींकडे सुरत-भुसावळ-महू-इंदौर या ठिकाणाचा व्यवहार सांभाळायची जबाबदारी होती. व्यापारानिमित्त धावपळ असायची. (नरडाणा (धुळे) येथे नेहमी ये-जा असायची. सुरवातीला नरडाणा येथे स्थायिक होण्याचे ठरले. त्यातच इंदौरला जात असतांना शिरपूर बस स्थानकावर छोटाभाऊ-मोठाभाऊ (लालबाग-शिरपूर) यांचेशी भेट झाली. त्यावेळी शिरपूरशी काही एक परिचय नव्हता. छोटाभाऊनी शिरपूरला राहण्यास योग्य असल्याचे सांगत चर्चा केली.) त्यामुळे पप्पाजींनी शिरपूरात रहायचे ठरवले. मम्मीजींचा होकार मिळवला. शिरपूर तसे लहानच. मम्मीजी मोठ्या घरातील असल्याने जुळवून घेतील कि नाही ही शंका पप्पाजींना होती. मात्र पतीच्या निर्णयात ठामपणे उभे रहायचे मम्मीजींनी ठरवले होते. १९५२ साली शिरपूर येथील आडत दुकान मालक गुलाबचंद यांच्या घराचा दुसरा माळा भाड्याने घेण्याचे ठरले. पण मम्मीजींना चिंता होती सासुबाईंची. प्रकृतीमुळे दुसरा माळा चढायचा त्रास होईल यामुळे खालचे घर महिना ५०/६० पैसे भाडेपोटी रहायला घेतले.

दरम्यान पप्पाजींच्या भावांतही वाटणी होऊन व्यवहार स्वतंत्र झाले होते. मोठ्या काकांनी उज्जैन येथील व्यवहार सांभाळला. तर लहान काकांनी राजस्थानमध्ये व्यवहाराची जबाबदारी घेतली. पप्पाजींनीही शिरपूरात दुकान, पेट्रोलपंप उभारीत सुरूवात केली होती. व्यापारातील कष्टात मम्मीजींचे योगदान होते. पप्पाजींचा परिचय वाढत होता. घरात येणारे जाणाऱ्यांचे आदारातिथ्य वाढले होते. १९५२ साली अमरीशभाईंच्या रूपाने पहिले पुत्ररत्न प्राप्त झाले. नंतर मुकेशभाई, भुपेशभाई यांचा जन्म झाला. मुलांवर बालपणापासून सुसंस्कार घडावेत ही मम्मीजींची इच्छा. घरातील वातावरण धार्मिक असल्याने साहजिकच मुलांवर योग्य संस्कार झाले. तिन्ही मुलात मुकेश भाईंचा खोडकर स्वभाव होता तर अमरीशभाई शांत पण शीघ्रकोपी होते. भावंडातील भांडणे मम्मीजी सोडवित. सोडवतांना गोष्टींचा आधार घेत.

मम्मीजींना मुलांच्या शिक्षणाची चिंता होती. चांगल्या शिक्षणाचा आग्रह धरित त्यांनी अमरीशभाईंना अहमदाबाद येथील सी.एस.स्कूल येथे प्रवेश मिळवून दिला. सी.एस. स्कूल येथे प्रवेश मिळणे प्रतिष्ठेचे मानले जाई. मुकेशभाई व भूपेशभाई उज्जैनला मोठ्या काकांकडे शिकण्यास गेले. (उज्जैनच्या काकू आमदार होत्या ) दिवाळी उन्हाळी सुटीत शिरपूरला मुलांचे येणे होई. रोज गोडधोड खायला मिळे. दुकानावरील कामाला असलेल्या मंडळींकडे (रामभाऊ बारी, सुकलाल माळी, रघुनाथ हजारे) यांच्या गरीब घरची लसूण चटणी तिघे भावंड आवडीने खात. त्यांच्यात खेळत मुले घरी आली की मित्रांची गर्दी असायची. मम्मीजी सर्वांना प्रेमाणे वागवीत. वेळप्रसंगी रागावत पण कधी थापटही लगावली नाही. मुकेशभाईंना विशेष करून समजावीत.

अमरीशभाईंनी दहावीनंतर शिरपूरच्या व्यापारात लक्ष घातले. मम्मीजींचे लाडके असल्याने अमरीशभाईंनी शिरपूरात राहूनच व्यापार सांभाळावा असा आग्रह होता. पेट्रोलपंप सांभाळीत व्यापारात यश मिळवू लागले. भुपेशभाईनी सुद्धा आठवीपासून अकरावीपर्यंत पां.बा.मा.हायस्कूल येथे शिक्षण घेतले. मुलांनी प्रगती करावी हे प्रत्येक मातेला वाटते. पण हे करतांना गरीबांच्या डोळ्यातील आसवं पुसण्याचा सल्ला मम्मीजींचा असे.

वर्ष १९६८ असावे. महापूर आला होता. महापूराने अनेक घरात पाणी शिरले होते. चूली पेटत नव्हत्या गोर गरीबांचे संसार उघड्यावर आले होते. पूरग्रस्तांची दयनीय अशी परिस्थिती पाहून मम्मीजींच्या पुढाकाराने छोटाभाऊंच्या घरी सर्व पुरग्रस्तांसाठी जेवणे सुरू झाली. गावातील इतर महिलाही मदतीला आल्या. तीनचार दिवस जेवणाच्या पंगती चालल्या. मम्मीजींचा स्वभावच मुळी संवेदनशील. वंचितांना, गरीबांना मदत करावी, दानधर्म जोपासावा, देवधर्म करावा ही शिकवण मुलांना असायची. घरातील वातावरणाचा 'संस्कार' मुलांवर होत होता.

कालांतराने मुकेशभाई आणि भुपेशभाई मुंबईला गेले. व्यापारात लक्ष घालू लागले. कष्टाच्या जोरावर प्रगतीकडे वाटचाल सुरू झाली. व्यापार वाढला. सर्वांची लग्ने झाली. नातवंडे आली. बंगला, गाड्या आल्या. ऐश्वर्य घरात नांदू लागले. हे सर्व होत

असतांना मम्मीजी मात्र तसूभरही गर्विष्ठ झाल्या नाही. सदैव मदतीचा हात देतच राहिल्या. परिसरातील गरीब मुलींच्या लग्नात नेहमीच मदत करू लागल्या. 'अन्नपूर्णा' च्या रूपात जेवणावळीचा धर्म जोपासला राहिल्या. देवधर्मासाठी मंदिराना सहाय्य केले दानधर्म केला.

मुलांनीही मम्मीजींना मुंबईला रहायला चला, असा आग्रह धरला. पण मम्मीजी शिरपूर सोडायला तयार नव्हत्या. ज्या गावाने प्रेम दिले, नाव दिले त्या गावाला सोडणे मम्मीजींच्या मनाला पटत नव्हते. उलट अमरीशभाईंना राजकारण, समाज कारण माध्यमातून शिरपूरसाठी जे चांगले असेल ते सर्व करा हेच सांगत. तसेच राजकारण नको म्हणणाऱ्या भुपेशभाईंना नगराध्यक्ष पदासाठी आग्रह धरणाऱ्या मम्मीजीच. त्याच बरोबर शिरपूरातील सर्वसामान्यांना उच्च व दर्जेदार शिक्षण दिले जावे यासाठी आर.सी.पटेल संस्थेची पायाभरणीचा संकल्पही त्यांचाच.

काळाच्या ओघात २००० साली संसाराच्या रथातील पप्पाजींच्या रूपाने असलेले एक चाक निखळले. मम्मीजींना दु:ख अनावर झाले. लगेच सावरण्याचा प्रयत्न केला.पण नियतीच्या मनात वेगळेच होते. जिद्दी स्वभावाचे हवे ते मिळवणारच असा बाणा असणारे नीडर मुकेशभाई प्रकृती अस्वस्थामुळे स्वर्गवासी झालेत. ही घटना मम्मीजी पचवू शकत नव्हत्या. पण सावरणे गरजेचे होते. खंबीर मनाच्या मम्मीजींनी ते पचवले आणि पुन्हा अमरिशभाई आणि भूपेशभाईच्या पाठीशी आशिर्वाद म्हणून उभ्या राहिल्या.

पप्पाजी आणि मम्मीजींनी केलेल्या संस्काराच्या बळावर समाजाचे देणे म्हणून अमरिशभाईंनी सुरू केलेल्या शैक्षणिक संस्थांनी गगनभरारी घेतली. शिरपूर सारख्या ग्रामीण भागात उच्च प्रतीच्या अभ्यासक्रमाची सुरुवात केली.गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर दिला जात होता.

आर.सी.पटेल शैक्षणिक संकुलाने शिक्षण क्षेत्रात ठसा उमटविला आहे. भूपेशभाईंनी देखील शिक्षणाकडे आवर्जुन लक्ष दिले आहे. दुरदृष्टी नियोजन,सकारात्मकता,चिकाटी यामुळे शिरपूर शहर विकासाला वेगळा आयाम दिला.सामाजिक कार्याला विकासाची जोड लाभल्याने शिरपूरचे नांव पटेल बंधुच्या कर्तुत्वाने जगभरात झाल्याचे आपण पहातो.

मम्मीजींनाही मुलावर अभिमान वाटतोय वयाच्या ८४ व्या वर्षात त्यांनी धार्मिकता जपली आहे.शिरपूरच्या पाठीशी भक्कम उभ्या आहेत.सामाजिक कार्याची नाळ तोडली नाही.ऐश्वर्य मिळाले आता काय करायचे असा विचार मनी आला नाही.गरीब आदीवासी मुलांना गोड जेवण देणे असो,थंडीच्या दिवसात शाली,स्वेटर वाटप असोत,लहान मुलांना आवडीने खाऊ देणे असो,वंचित महिलांना मदतीचा हात असो त्यांनी दातृत्व कधी सोडलेले नाही.

म्हणूनच 'हेमंतबेन' आपल्या दातृत्वाच्या बळावर शिरपूरकरांचे 'मम्मीजी ' झालेत वाढत्या वयाचा त्रास मम्मीजींना जाणवतो.पण खंबीर मन अजुनही शाबूत आहे.आलेल्यांना मनापासून आशिर्वाद द्यायला हात अजुनही आखडता घेत नाही.

महिलांनो
तुमच्यासाठी ...


# महिलांसाठी योजना...

**प्रधानमंत्री मातृवंदना योजना ...**

आई कामावर गेल्याने बाळाला आईचं दूध मिळत नाही. बाळाचेही पोषण होत नाही आणि यातून कुपोषणाची समस्या जन्म घेते हीच बाब लक्षात घेऊन केंद्र सरकारने प्रधानमंत्री मातृवंदना योजना १ जानेवारी २०१७ पासून राबवण्यास सुरूवात केली. महाराष्ट्र शासनाने ही योजना सर्व जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक तथा आरोग्य सेवेचे आयुक्त हे राज्य पातळीवरील समन्वय अधिकारी म्हणून काम करतील. ही योजना केवळ पहिल्याच अपत्यासाठी व सरकारने अधिसूचित केलेल्या संस्थेत नोंदणी झालेल्या स्त्रियांना लागू आहे. या अंतर्गत पाच हजार रूपयांची रक्कम तीन टप्प्यांत संबंधित लाभार्थी स्त्री च्या खात्यात थेट जमा करण्यात येईल. या योजनेचे लाभ वेतनासह मातृत्त्व रजा मिळणाऱ्या स्त्रियांना मिळणार नाही.मातृवंदना या योजनेमधून आर्थिक साहाय्यचा १ हजार रूपयांचा पहिला हप्ता गरोदर मातांनी शासकीय रूग्णालयात नोंद केल्यानंतर मिळेल. दुसरा दोन हजार रूपयांचा हप्ता बाळंतपूर्व तपासणी करतांना गर्भधारणेच्या सहाव्या महिन्यानंतर मिळेल. योजनेतील तिसरा दोन हजार रूपयांचा हप्ता स्त्री प्रसूत झाल्यानंतर बाळाला सर्व लसी दिल्याची खात्री केल्यानंतर मिळेल.



# नास्ति मातृसमा गतिः



डॉ.पुरूषोत्तम भापकर (भा.प्र.से.)
मा.विभागीय आयुक्त,औरंगाबाद
चलभाष : ७५०६२६६१४४

**आमच्या गावातील शाळा चौथीपर्यंत होती. पुढील शिक्षणासाठी खरडगावाला जावे लागे. पायात कधी चप्पलही नसे. एकच ड्रेस असे. आई तोच ड्रेस धुवून देई. स्वच्छ टापटीप शाळेत जाण्याकडे आईचा कटाक्ष असे. मोठयांनी वापरलेली पुस्तके लहानांना मिळत. नवीन पुस्तकांचा खर्च आई शक्यतो टाळे. फाटलेल्या पुस्तकांना केतकड नावाच्या वनस्पतीच्या फणटयांचे दोरीसारखे भाग करून आई शिवून देत असे. काटकसरीची सवय, योग्य वेळी बचत कशी करावी हे आईकडून शिकलो. आम्ही भावंडे अभ्यासात हुशार व्हावी, संस्कारीत व्हावी यासाठी आईचा नेहमी प्रयत्न असे.**

माझ्या आईचे नाव केशरबाई. जन्म १९३८ सालचा. आईचे बाळंतपण धावणवाडी (मुर्शदपूर) या अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यात गेले. पन्नास उंबरठयाचे लहानसे गाव. आईच्या घरची परिस्थीती तशी बेताचीच. आईचे आजोबा लक्ष्मण धावणे गावाचे कारभारी. चार काका चार आत्या अशा एकत्रित कुटूंबात आईचे बालपण गेले. एकत्रित कुटूंब पध्दतीचे संस्कार साहजिकच आईवर झालेले.

माझे आजोबा (आईचे वडिल) रामभाऊ व आजी भागीरथीबाई यांच्या पोटी आईसह दोन बहिणी. सारे कुटूंब एकत्रच त्यामुळे सहजच बहूतांश छोटी कामे आई–बहिणींसोबत करित असे. आजोबा शेती करित. शेतातील कामाची सवय आईला चांगली अवगत होती. आईच्या शेताला 'मासुळी 'म्हणत. म्हणजे त्यावेळी पाणी भरपूर असल्याने विहिरी काठोकाठ भरलेल्या असत. त्यात लहान मासळी अलगदपणे भांडयात सापडायची. आईचे काका विश्वनाथ यांचा घरात दरारा होता. ते फार शिस्तप्रिय. त्यांची करडी शिस्त आईच्या अंगी भिनली. नि पुढे जाऊन याच शिस्तीचे धडे आम्हा भावंडाना मिळत गेले.

आईच्या गावी त्याकाळी शाळा नव्हती. त्यामुळे माझ्या दोन्ही मावश्या नि आई शिक्षणापासून वंचित राहिली. पण आईच्या अशिक्षितपणाची झळ आम्हा भावंडाना कधी बसली नाही.

माझ्या आईचे लग्न चौदाव्या पंधराव्या वर्षीच झाले. जवळच असलेल्या सालवडगाव येथील भापकरांच्या मोठ्या घराण्यातील निवृत्ती भापकर यांचेशी आईचा विवाह १९५२ साली झाला. मोठे घराणे याचा अर्थ घरातील जास्त माणसांची संख्या. पुर्वी घरात माणसे जास्त तर घराणेही मोठे मानले जाई. आईला पाच नणंदा नि दोन दिर. माहेरप्रमाणेच सासरीदेखील एकत्रित कुटुंबाची पध्दत होती.

आईचे सासरे नि माझे आजोबा यांच्या मनमिळावू स्वभावामुळे त्यांना गावात मान होता. सरकारी दवाखान्यात मिळणाऱ्या सर्दी तापाच्या गोळया घरी असत. गावातील किंवा आमच्या गुऱ्हाळातील कुणाला ताप आला की आमच्या घरच्या गोळया दिल्या जायच्या. साहजिकच अनेकांचा राबता घरी असल्याने आईची तारांबळ उडत असे.

माझे आजोबा गुऱ्हाळातील गुळाचे ढेपीचे बाजार करायचे.

गुऱ्हाळात तयार  झालेला गुळ बैलगाडीतून आठवडी बाजारांना न्यायचे.कधी कधी आईसुध्दा बाजाराला जाई. आजोबा उदार मनाचे होते. ग्राहकाल गुळ देतांना नेहमी मापापेक्षा जास्त देत. त्यांच्या या स्वभावाचा आईचा मनावर परिणाम होई.

आईच्या अंगी कष्टाची शिदोरी पुरेपूर होती. सतत कामातच गुंतलेली असायची. घरातल्या कामाबरोबर शेतातील कामांचीही जबाबदारी आई पेलायची. आईला पहिले मुल झाले तेव्हा माझे आजोबा फार खुश झाले. कारण त्यांचा मोठा मुलगा म्हणजे माझे मोठे काका यांचे निधन झाले होते. तेच पुर्वजन्म होऊन आईच्या पोटी असेल असे त्यांना वाटे. त्याचे नाव देखील आबासाहेबच ठेवले.

माझ्या आई वडिलांच्या पोटी दुसरे मुल म्हणून माझा जन्म झाला. माझे जन्मनाव पुरूषोत्तमच. परंतु मला घरात सुरेश म्हणत. आई मला नेहमी शेतात घेऊन जाई. झाडाला झोळी बांधून मला झोपी घालून आई कामाला सुरूवात करायची. मी शेतात आईकडे कमी तर आईच्या सोबत काम करणाऱ्या इतरांकडेच जास्त असायचा. एकदा लहानपणी मी  झोपेत असतांना झोळीतून खाली पडलो. तेव्हा माझ्या आत्यासमोरच मी पडलो. पडल्याने मला दुखापत वगैरे झाली नाही पण मी रडलो देखील नाही. तेव्हा माझी आत्या 'आईसारखाच सहनशील आहे' असे म्हणाल्या होत्या.

आमच्या गावात पहिली ते चौथी पर्यंत जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा होती. ही शाळा सुरू करण्यात श्री बाळासाहेब भारदे यांच्या मोलाचा वाटा होता. माझे आजोबा नि बाळासाहेब यांचा स्नेह चागला होता. बाळासाहेब आमच्या गुऱ्हाळात नेहमी येत. म्हणूनच आजोबाच्या मागणीनुसार मंडळांची शाळा लगेच मंजूर झाली. गावातील मुलांबरोबर आम्हा भावंडाची शिक्षणाची सोय झाली होती. आम्ही शाळेत जात असे तेव्हा आईला होणाऱ्या आनंदाची झलक तिच्या चेहऱ्यावर दिसत असे आईचे शिक्षण झाले नव्हते परंतू आमच्या शिक्षणासाठी मात्र तिचा नेहमी आग्रह असे.

माझा लहान भाऊ रघुनाथ आईला स्वयंपाकात मदत करीत असते. ज्वारीच्या भाकरी विस्तवावर खमंग भाजून, कोथंबीर टाकून लाल मिरच्यांशी चरणी करून ठेवी. आईला त्याच्या स्वयंपाकाची गोडी वाटे. स्वयंपाकघरातील त्याची लुडबूड आईला आवडे. आईने देखील त्याला कधी स्वयंपाकाच्या कामास नकार दिला नाही.

आमच्या शेतात ऊस असल्याने शेतातच गुऱ्हाळ सुरू केले होते. बैल चरख्याच्या सहाय्याने ऊसाचा रस काढला जाई मोठ्या कढईत हा रस असायचा. आसपासचे लोक रस पिण्यासाठी किंवा काकवी (कच्चा गुळ) खाण्यासाठी नेहमी थांबत. त्यांना कधीही आमच्या आजोबांनी किंवा कुटूंबातील इतरांनी नाही म्हटले नाही. गुऱ्हाळ शेतात असल्याने आम्ही सकाळी लवकरच कामे आटोपून गुऱ्हाळात मदत करण्यासाठी येत असू. आईने शाळेबरोबर घरची कामे करण्यास नेहमीच प्रोत्साहन दिले. तसेच गुळाची ढेप चार पाच रूपयाला विकली जाई. एवढा फायदा होत नसे. त्यामुळे घरात नेहमीच आर्थिक चणचण राही.

आमच्या शेतात लिंबाचे मोठे झाड होते. त्याचे खोड खूप मोठे झालेले होते. त्या खेडात सहज शिरता येई. गुळाच्या ढेपीमुळे कधी कधी आम्ही त्या लिंबाच्या आल्यात रहायचो. भर पावसात, थंडीतही रहायचो. शेतात ऊसाबरोबर ज्वारीही असायची. आई भल्या पहाटे उठून जात्यावर दळण दळून नंतर ज्वारीचे राखण करण्यासाठी शेतात येई. दुपारपर्यंत शेताचे राखण करीत असे. हिरव्या कोवळया दाण्यांपासून आम्हा भावंडाना हुरडा खाण्यास देत असे. आईच्या प्रेमाची चव हुरडयाला नक्कीच असे.

माझे आजोबांना गावात सारेजण 'भाऊ'म्हणत. कोणाचीही समस्या, अडचण ते दूर करण्याचा प्रयत्न करित. आमची परिस्थीती जेमतेम होती. तरी इतरांच्या मदतीला धावण्याची, जमेल तेवढी मदत करण्याची त्यांची शिकवण आईबरोबर आम्हास मिळत असे. कुणाला त्रास देणे त्यांना कधी जमले नाही. कष्टाची सवय प्रत्येकाच्या अंगी असावी असा त्यांचा आग्रह असे. आईने देखील आम्हाला कष्टापासून कधी दूर केले नाही.

आमच्या शेतात घासाचे पीक घेतले जाई. त्या घासाच्या छोट्या पेंढया बनवून बैलगाडीत रचून शेवगावला विकायला नेत असू. कधी कधी आई देखील सोबत असे. आलेल्या पैशातून आई गहू, बाजरी आणून स्वच्छ करून जात्यावर दळायची. कधी कधी धान्य नसले की आई, शेतातून बरबडा आणून भाकरी बनवायची. भल्या पहाटे उठून आई माझ्या काकू शेतावर असलेल्या विहिरीतून पाणी आणत असे. पाणी भरल्यानंतर जात्यावर दळण दळायची. भाकरी थापायची नंतर शेतात कामाला जायची. आईच्या कष्टाची आजही आठवण

ताजीच आहे. आमच्या वाटयाचे कामही आईच करत असे. आम्हाला शाळेत जायला उशीर होईल म्हणून स्वत: धडपडत आमच्या कामात मदत करी.

खरडगाव शाळेत असतांना मुख्याध्यापक बापू गुरूजी होते. मी त्यांचा आवडता विद्यार्थी होतो. स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताकदिनी मला नेहमी भाषण पाठ करण्यास देत. त्यामुळे या दिवशी आई माझा ड्रेस स्वच्छ धुवून देई. घरात इस्त्री नव्हती. चुरगाळलेला ड्रेस घालणे आईला आवडत नसे. तेंव्हा तांब्यात कोळसा टाकून कपडयांना इस्त्री करून देई. फाटलेल्या ठिकाणी ठिगळ लावण्याची कलाही आईला अवगत होती. घरात लाईट नव्हती . रात्री केरोसिनवर चालणाऱ्या चिमण्या आई स्वच्छ करी. काच पुसून घेई. कारण आमचा अभ्यास याच चिमणीच्या प्रकाशावर होई.

कुटूंब मोठे होते. वीस पंचवीस जणांच्या कुटूंबाची नेहमीच आर्थिक तारांबळ असायची. त्याही परिस्थीतीत आई आमच्या शिक्षणासाठी झटत असे. मी वर्गात हुशार असल्याने आईचा माझ्यावर लोभ होता. मी कधीही पहिला नंबर सोडला नाही याचा आईला अभिमान वाटे. वहया पुस्तके नसतांना माझा पहिला नंबर येतो हे नेहमी इतरांना सांगे. कष्टाचे सोने होते यावर तिचा ठाम विश्वास होता.

सातवी पास झाल्यानंतर आठवीसाठी पुढे शेवगावी पाच किलोमीटर अंतर पायी जावे लागे. अनवाणी जाऊ नये यासाठी आई केलेल्या बचतीतून चप्पल घेऊन देई. त्याकाळी भारदे हायस्कूल प्रसिध्द होते. हायस्कुलला मी शिकतो याचा आईला विशेष अभिमान वाटे. मी मॅट्रिक पास झालो तेंव्हा तर आईसह साऱ्याच कुटूंबाला, गावाला आनंद झाला होता. परिस्थिती नसली तरी शिक्षण घेता येते. असे आई इतरांना सांगे. गावातील मुलांनाही शाळेत पाठवा असा आग्रह धरी.

मॅट्रीकनंतर मला इंजिनिअरींगला प्रवेश घेता येत होता. मात्र आर्थिक परिस्थीती बेताची होती. घरातील इतरांचे शिक्षण होणे बाकी होते. म्हणून मला डी. एड.ला पाठवले. अहमदनगर येथे डी .एड करतांना आर्थिक अडचण खूप यायची. मात्र आईचा धीर कामी यायचा. दोन वर्षे कशीतरी काढली. डी एडला देखील महाराष्ट्रातून पहिला आलो. आईच्या नि माझ्या कष्टाचे चीज झाले होते.

माझा मोठा भाऊ वायरमनच्या हाताखाली काम करू लागला खड्डे खोदणे, खांबावर चढणे, अशा कामातून मिळणाऱ्या मजूरीने घरात हातभार होऊ लागला. मला देखील शेवगावमध्ये प्राथमिक शिक्षकाची नोकरी मिळाली. कमी वयात सरकारी नोकरी मिळाल्याचा आनंद आईला किती झाला असेल ? महिन्याला तीनशे पन्नास रूपये पगार मिळू लागला होता. चांगल्या दिवसाची सुरूवात झाली, कष्टाला फळ आले असे आई – वडील म्हणू लागले.

पुढे मी देखील प्राथमिक शिक्षणाच्या नोकरीवर समाधानी न रहाता बी.ए.ला प्रवेश घेतात.अर्थशास्त्र विषय घेऊन पहिला नंबर मिळवला. एम.ए.शिक्षणासाठी नोकरी सोडली. पुण्याला शिकण्यास गेलो. शिक्षणासाठी मळा विकावा लागला. पुण्यात गोखले संस्थेत दाखल झालो. आईच्या शिकविणीच्या बळावर मागे न हटता नोकरी सोडण्याचा धाडसी निर्णय घेतला. आणि शिक्षणाबरोबर स्पर्धा परिक्षांचा अभ्यास सुरू केला.

अतिशय कठीण परिस्थीतीत एम.ए पुर्ण केले. एम.फील.प्रवेश परिक्षेत देशात दुसरा नंबर मिळवला. आणि युजीसीची दरमहा सहाशे रूपयाची फेलोशिप मिळवली. पुढे वडिलांचा आग्रहाखातर पुणे सोडले. पुन्हा शेवगाव येथे प्राध्यापकाची नोकरी मिळाली. त्यानंतर सहाच महिन्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परिक्षा उतीर्ण झालो. नि मी 'क्लास वन'अधिकारी झालो. तेंव्हा उभ्या पंचक्रोशीत माझा गवगवा झाला. यावेळी माझ्या आईला झालेला आनंद शब्दात वर्णन करू शकत नाही.

पुढे सहाही भावंडे त्यांच्या पायावर उभी ठाकली. मोठा भाऊ आबासाहेब वायरमन, लहान दिगंबर बजाज कंपनीत नोकरीला, रेवणनाथ वकील, तर दत्तात्रय व ज्ञानेश्वर दोघेही शेती सांभाळू लागले. आईच्या कष्टाचे चीज झाले होते.आणि आईच्या डोळ्यादेखतच मी देखील उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी, मुख्यकार्यकारी अधिकारी, सचिव, विभागीय आयुक्त अशा उच्च प्रशासकीय पदांवर पोहचून 'सेवाभाव' जपत कामात प्रामाणिकपणा जपला होता.

आजही आई नि वडील गावीच शेवगावी असतात. कधीकधी आम्हा भावांकडे आई येते. दोनचार दिवस रहाते. मात्र शहरी वातावरणापेक्षा गावच्या शेतीच्या मातीशी तिची ओढ जास्त म्हणून लगेच गावी शेवगावी परतते. या आईच्या ऋणातून उतराई होऊच शकत नाही. तिला मिळालेल्या दिर्घायुष्याच्या अपेक्षेनेच त्याला नतमस्तक होऊन माझी आई सतत डोळ्यासमोर राहु दे अशी प्रार्थना करून आईचा हात पाठीवर राहिल्यानेच सारे काही सुख पदरी आले असे



# नास्ति मातृसमा त्राण



डॉ.मीना कुटे
प्राचार्य: पी.व्ही.डी.टी.शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
एस.एन.डी.टी.वुमेन्स युनिव्हर्सिटी, मुंबई.
चलभाष : ९२२६४८४३१७

**माझ्या आईला तिच्या आयुष्यभर लेकुरवाळे रहावे लागले हयाला कारण मोठी वहिणी. मणक्याचे चार ठिकाणी तुकडे झाल्यामुळे. वहिणी पाच वर्ष अंथरूणावर खिळून होती. तिचे पाच अपत्य. पहिल्या तीन मुली व नंतरची दोन मुले.त्यांना सांभाळण्याची जबाबदारी तिच्यावर आली. वहिणी २००० साली गेल्यानंतर भाऊही दोनच वर्षात पुन्हा दुसरी पत्नी व एक मूल ठेऊन गेला. तेव्हा आईवर आकाश कोसळले. हया नातवंडांचे करता करता ती पार खचली. वडीलांचा मृत्यु १९९७ साली झाला. आणि संकटांची मालिकाच आमच्या घरी सुरू झाली. १९९८ ला माझे पती वारलेत. माझी दोन मुले सांभाळून माझा धाकटा बंधू देवेंद्र हयाचे आय.टी.आय माझ्याकडेच केले. त्यानंतर तोही वयाच्या ३८ व्या वर्षी हे जग सोडून गेला. त्याची पत्नी एक मुलगी व दोन वर्षाचा मुलगा त्याची आठवण म्हणून जगात आहेत.**

८ मार्च. आंतराष्ट्रीय महिला दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. स्त्रीचा सन्मान, एका दिवसापुरताच का ? लक्ष्मी,शक्ती व सरस्वतीचा सुरेख त्रिवेणी संगम असलेली स्त्री, फक्त एका दिवसाच्या सन्मानाने खरेच सुखावते का ? अशा अगणित स्त्रीया आहेत, ज्यांना कधीही,कुठेही,कोणत्याही प्रकारचा पुरस्कार, सन्मान समाजाकडून, कुटूंबियांकडून मिळत नाही. खरेतर त्या 'हिरकणी 'असतात. समाजभुषण असतात. प्रतिकूल परिस्थितीत कुटूंबाला सावरणाऱ्या असतात. माझी आई 'यमुनाबाई' आज ती आमच्यात नाही. हया जगाचा निरोप तिने १५ वर्षापूर्वीच. वयाच्या ७० व्या वर्षी घेतला. उंच,गोरी पान, कपाळभर कुंकूवाची चिरी, नऊवारी लुगडे, डोक्यावरचा पदर कधी खाली पडलेला मला आठवत नाही. माहेरी तिला सर्व जण 'आक्का 'म्हणत आणि सासरी तिला सर्वच 'काकू' म्हणत. अत्यंत तापट, शिस्तप्रिय , राकट पण मनाने अत्यंत हळवे असे माझे वडील. शरीर यष्टीने पहिलवान माणूस. ते अनेक कुस्त्या जिंकलेत. त्यामुळे राग सतत नाकावरच असे. त्यांना संपुर्ण गावात 'रामभो पैलवान' म्हणत. आई बऱ्या पैकी आर्थिक स्थिती असलेल्या घरची लेक होती. आम्ही १६ भावंडे, त्यापैकी ९ जगलेत. ७ अपत्यांनी कळायला लागण्या आधीच जगाचा निरोप घेतला. त्यात आम्ही पाच बहिणी, चार भाऊ.

आज माझी मोठी बहीण सौ. रजनी नागरे हया जगात नाही. आईच्या नंतर, पाचच वर्षात तिने सौभाग्याच लेणं घेऊन आमचा निरोप घेतला. तसाच माझा थोरला भाऊ, दोन नंबरचा, प्रकाश. तो तर आईच्या आधी गेला. त्यामुळेच आमची आई खचली. तीन जावई, मुलगा –सुन जिच्या डोळ्यादेखत हे जग सोडून जातात. नियती तिच्या तरूण मुलींच्या जीवनात असा अचानक घाव घालते. त्यावेळेला तिचा कष्टाचा पिंड. वेदनेने व्याकुळ होतो. पहाडासारखी धिप्पाड माझी आई, एकदम खचते. फ.मु.शिंदे कवी म्हणतात, 'आई असते जन्माची

शिदोरी, सरतही नाही, उरतही नाही. ती नसते तर घराला घरपण नसते.' माझी आई - गरीबीचा संसार स्वाभिमानानं कसा करावा याच दिग्दर्शन करून गेली.

आज आई असती तर, तिने केलेल्या कष्टाचे, त्यागाचे, संस्काराचे फलित तिला चाखायला मिळाले असते. मी तिसऱ्या क्रमांकाची. मला आठवते, आईला दर महिन्याचा, पगाराच्या दिवशी माझ्या वडिलांना हिशोब द्यावा लागायचा. त्यादिवशी आईची सत्व परिक्षाच असायची. ९ लेकरे खाणारी. किराणा बिलासाठी आईला वडीलांची लाख बोलणी खावी लागत होती. जणू काही ती गुन्हेगार असे. त्यातून तिचा प्रेमळ-स्वभाव असल्याने सर्वाना मान-सन्मान देण्याची मूळ प्रवृत्तीमुळे माहेरचे सर्व नातेवाईक घरी येत असत. आई, त्यांना पाहुणचार केल्याशिवाय जाऊ देत नसे. पण त्याचा, पगाराच्या दिवशी - बील मागतांना तिचा जो पानउतारा होत असे. निमुटपणे ती सहन करीत असे. सतत ती अन्यायाच्या दडपणाखाली असे. माझ्या नंतर तीन बहिणी व तीन भाऊ ह्या सर्वांचे शिक्षण सुरू होते. वडील नगरपरिषदेत कारकुनाची नोकरी करीत होते. कारकुनाचा पगार तो काय असणार? आज आम्हाला दोन मुलांचे शिक्षण, आवडी-निवडी पूर्ण करता करता नाकी नऊ येते. त्या माऊलीने कसे केले असणार ? हयाचा विचार सुध्दा करतांना अंगावर शहारे येतात.

माझ्यानंतरच्या सर्व भावंडाचा जन्म (आईचे बाळंतपण) दोंडाईचा येथे घरीच झाला. 'ताराबाई ' नावाची सुईण यायची. डॉ. टोणगावकरांच्या दवाखान्याच्या परिसरात त्या रहात असत. ताराबाईंना बोलावून आणण्याची जबाबदा री माझी होती. प्रसुतीच्या वेदना सहन करीत- शेवटच्या क्षणापर्यंत आई आमच्यासाठी स्वयंपाक, इतर सर्व कामे करीत असे. वडीलांचे हवे -नको ते पहाणे आलेच. घरातच मुलांना जन्म देऊन, दुसऱ्या दिवशी खाटेवरून उठून चूलीवर पुन्हा आमच्यासाठी अन्न शिजवणे आले. ना तिला कधी तूप मिळाले ना सकस आहार. अशाही परिस्थतीत आम्हांला वर्षाला एक गणवेश, एक साधा ड्रेस मिळे. सर्वांना शाळेत पाठविणे , घरची कामे, धुणी,भांडी, घरसफाई करणे, पाणी भरणे, वडीलांसाठी ग्रंथालयातून एक दिवसाआड पुस्तक वाचनासाठी आणणे, शेण गोळा करून वर्षभरासाठी गोवऱ्यांची पोती भरून ठेवणे. बाजारातून बकरीला चारा आणणे....भावडांना सांभाळणे हि कामे केली. विशेषत: मोठया ताईची मुले व माझे दोन नंबर,तीन नंबरचे भाऊ हे बरोबरीचे. त्यामुळे ताई गावात असूनही तिचे येणे फार कमी असे. म्हणून सर्व जबाबदारी वयाच्या १७ वर्षापर्यंत मी माहेरी असे पर्यंत मोठया बहिणीसारखी मला पार पाडावी लागे. वर्षातून सुरूवातीलाच एकदा वर्षभरासाठी वह्या-पुस्तके वडील विकत घेत असत. नंतर वर्षभरात आम्हाला काहीही मागण्याची आज्ञा नसे. आर.डी.एम.पी. हायस्कूल, गर्ल्स हायस्कूल मध्ये माध्यमिक शिक्षण झाले आणि सुरूवातीचे प्राथमिक शिक्षणाचे धडे आम्हां बहिणींना जिल्हा परिषदेच्या शाळांमध्येच घ्यावे लागले. परंतू घरी कडक शिस्त,आईची कडक देखरेख, अभ्यासास रात्री गल्लीत दिव्याखाली बसून करणे इ. गोष्टींमुळे आज आम्ही तिघी बहीणी उच्च विद्याविभुषीत होऊन आपापल्या संसाराची धुरा सांभाळीत आहोत. कल्पना मानकर-कुटे ही एम.ए.एम.एड झाली डी.एड. झाल्यानंतर मातृसेवा संघांच्या शाळेत शिक्षिकेच्या नोकरीस सुरूवात केली. ह्याच महिन्यात मार्च २०१९ अखेर बाफना स्कुलमधून निवृत्ती घेईल. धाकटी अरूणा शिंत्रे ही जिल्हा परिषदेत शिक्षणाधिकारी हया पदावर कार्यरत आहे. माझ्या पती निधनानंतर लगेचच कल्पना व अरूणा हयांचे ही यजमान मुलांची,सासू-सासऱ्यांची जबाबदारी सोपवून जगाचा निरोप घेऊन गेलेले. पण आईच्या संस्कारमय शिदोरीने आपापले कुटूंब सांभाळत, पुन्हा स्वत:च्या पायावर खंबीरपणे उभे रहाण्याचे धाडस माझ्यासह, माझ्या दोघी बहिणींनी दाखवले. सर्वात लहान पदवीधर झाली. बडोदा येथे उत्तम गृहिणी म्हणून संसार करीत आहे.

भावांबद्दल आई खूपच हळवी होती. कारण आम्हां चार बहिणींच्या पाठीवर झालेले माझे तीन भाऊ खूपच लहान असतांना मनाला चटका लावून गेलेत. तेव्हा दिपक,राजेंद्र,देवेंद्र हया तिघांबद्दल तिला खूप प्रेम . दिपक दोंडाईचा येथे बी. कॉम. ची पदवी घेऊन मका फॅक्टरीत टेलिफोन ऑपरेटर म्हणून कार्य करतो. तर राजेंद्रला एम.ए.बी.एड. पर्यंतचे शिक्षण दिले. धुळे येथे कनिष्ठ महाविद्यालयात त्याला प्राध्यापक म्हणून रूजू केले. त्याची पत्नी देखील एम.ए.आहे.

आईने घर चालविण्यासाठी, मुलांना आवश्यक त्या गरजेच्या वस्तू घेण्यासाठी खेडयांवर जाऊन गूळ, बोंबील, सोडे विकण्याचाही व्यवसाय केला. वडील घरी येण्याच्या आत तिला घरची वाट धरावी लागे. पुन्हा घरचे सर्व करून ती हा छोटासा उद्योग करीत होती. समाजाचे कोणाकडे ही लग्नकार्य

असेल तर त्याकाळात स्वयंपाक , गोंधळाची भाजी इ. बनविण्याचे उत्तम कार्य पुरूषांच्या बरोबरीने ती करीत असे. आईच्या  हाताला जी चव होती, ती खाणाऱ्याच्या मुखात राहत असे. माझे दोन मामा त्या काळी पोलीस अधिकारी होते (पी.एस.आय.) परंतू स्वाभिमानाने जगणारी आई, आम्हांला तिने कधीही  मामांकडे जावून याचना करण्याची वेळ येऊ दिली नाही. उलट आज समाजाला सिध्द करून दाखविले की 'यमुनेचे 'संस्कार एवढे जबरदस्त होते की तिच्या  लेकींनी कठीण परिस्थितीतही उच्च शिक्षण घेतले. त्यांचा नावलौकीक वाढला. मी स्वत: १२ वी शाळेत असतांना माझे लग्न झाले होते. सासरी राहून एम.ए.एम.एड., एम.फिल.,पी.एचडी. पर्यंतचे शिक्षण घेऊन प्राथमिक शिक्षिका ते प्राचार्य, कुलसचिव, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ मुंबईत आपला ठसा उमटवू शकले ते केवळ आईच्या संस्कारामुळे. आईने दिलेले पाथेय आजही सोबतीला आहे. जेव्हा जेव्हा ठेच लागते 'आई' शब्द येतो. ती आई मग मार्ग दाखवते. प्रामाणिकतेचा, सचोटभचा, स्वाभिमानाचा . म्हणूनच म्हणावेसे वाटते. आई, असेल जर पुन्हा मानव जन्म तुझ्याच उदरी जन्माला यावे. तुझी सेवा हयात असतांना नाही करता आली, तुझी सेवा करण्याची संधी जगत नियत्याने पुन्हा पुन्हा द्यावी. तुझे उपकार थोर म्हणूनी आम्हीही हया जगात ताठ मानेने जगू शकलो तुझा सन्मान कोणत्या शब्दात करू? शब्दही अपुर्ण पडतील....

महिलांनो
तुमच्यासाठी ...

# पोलिसांकडून मदत कशी मिळवावी?

* महिलांनी त्यांच्याविरूध्द होत असलेल्या गुन्ह्याची तक्रार देण्यासाठी न घाबरता पोलिस ठाण्यास जावे.
* पोलिस ठाण्यात महिला अधिकारी तत्काळ दखल घेऊन तक्रार नोंदवून घेतील. तुमची तक्रार तुम्हाला वाचून दाखवली जाईल व फिर्यादीची एक प्रत त्वरित विनामूल्य  दिली जाईल.
* विनयभंग, बलात्कार यांसारख्या गुन्ह्यांचे घटनास्थळ कोठे आहे याची काळजी करू नका. कोणत्याही पालिस ठाण्यात  जा. पोलिस तुमची तक्रार नोंदवून संबंधित पोलिस ठाण्यास त्वरित हस्तांतरित करतील.
* महिला जर लैंगिक गुन्ह्याचा बळी बसेल तर महिलांच्या वतीने इतर कोणत्याही व्यक्ती पोलीस ठाण्यास येऊन तक्रार देऊ शकते.
* महिला जर पोलीस ठाण्यास जाऊ इच्छित नसेल पोलिसांच्या मुंबई येथील १०३ व उर्वरित महाराष्ट्रकरिता १०९१ या हेल्पलाईनवर संपर्क साधा. महिला पोलीस अधिकारी साध्या वेशात तुम्हाला सोयीस्कर ठिकाणी भेटून तुमची फिर्याद / जबाब नोंदवतील.
* महिला जर स्थानिक भाषेत बोलू शकत नसेल किंवा काही शारीरिक /मानसिक व्यंग असेल तर पोलिस दुभाष्या  किंवा विशेष प्रशिक्षक बोलून त्यांच्या मदतीने तुमची फिर्याद / जबाब नोंदवून घेतील.
* पोलिस तुम्हाला गरजेनुसार वैद्यकीय उपचार/तपासणीसाठी रूग्णालयात घेऊन जातील व महिला वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून तपासणी करून घेतील.
* जर तुम्हाला आश्रय / निवारा हवा असेल तर तोही मिळवून देण्यास पोलिस सहकार्य करतील.  महिला पोलिस अधिकारी पोलिस ठाण्यामध्ये नसतील तर संध्याकाळनंतर पोलिस स्टेशनमध्ये नसतील तर संध्याकाळनंतर पोलिस स्टेशनमध्ये महिलेस बोलविता येत नाही.
* महिला सायबर गुन्ह्याबाबत सायबर सेलशी संपर्क साधू शकतात. एखाद्या महिलेला अटक करताना महिला पोलिस व महिला साक्षीदार असतात.
* महिला त्यांच्याप्रकरणी जिल्हास्तरावर पोलिस अधीक्षक/आयुक्त कार्यालयातील महिला व मुलांकरिता सहायता कक्ष यांच्याकडे मदत मागू शकतात.

*** संकलन- सोनिका संदेश हजारे**



# नास्ति मातृसमा प्रिया



अर्चना विजयराव देशमुख
सहाय्यक संचालक
विभागीय माहिती कार्यालय,नाशिक
janhavi9610@gmail.com

**भावाने डी फार्मसी पूर्ण केल्यानंतर काही दिवस त्याने एम.आर. म्हणून नोकरी केली. त्याच्याबाबतीत आईचं स्वप्न होत की, पुढे जावून भावाचे मेडिकल व आईचे खतांचे दुकान असावे. त्यासाठी आईने ३०-४० वर्षांच्या काळानंतर पुन्हा बी.एस्सी. ॲग्रीसाठी मुक्त विद्यापीठात प्रवेश घेतला. पहिले वर्ष आई प्रथम श्रेणीत पास झाली. परंतू त्यानंतर काही दिवसातच २००१ साली भाऊ अचानक एका अपघात गेला. एकुलता एक २१ वर्षांचा मुलगा गेल्याचं आईसाठी काय दु:ख असतं याचा विचारदेखील करवत नाही. नशीबाने आमच्या कुटुंबावर केलेल्या त्या आघातामुळे निर्माण झालेली पोकळी आज १८-१९ वर्षांनतर देखील तशीच आहे. त्यावेळी आई तर कोलमडली होती. आपले परक्याची जाण ही दु:खातच होत असते, याची जाणीव आम्हाला भाऊ गेल्यानंतर झाली. नातेवाईकांचेही खरे रूप यादरम्यान पहायला मिळाले. मुलाच्या जाण्याने पूर्णपणे खचलेल्या आईने तीन वर्ष घराचा उंबरा पाहिला नव्हता. मुलगाच गेल्याने नातेवाईक देखील समारंभाना किंवा कुळधर्माच्या कार्याला बोलवायला टाळणं अशा गोष्टी सुरू झाल्या होत्या.**

प्रत्येकाच्या आयुष्यात आपल्या आईच एक वेगळचं स्थान असतं. ती कुणाची पहिली गुरू असते, तर कुणाची मैत्रिण. माझ्यासाठी माझी आई म्हणजे शक्ती आणि ऊर्जेचा अखंडपणे वाहणारा प्रवाह आहे. आई नावातच सर्व काही सामावले आहे. माझ्या आईचं लहानपण सांगायच झालं तर एका मध्यवर्गीय शेतकरी कुटुंबातील तीन बहिणी व एक भाऊ. आई सर्वात मोठी असल्याने लहानपणापासूनच सर्व जबाबदारी तिच्यावर होती. वयाच्या दुसऱ्या तिसऱ्या वर्षीच मामा मावशीकडे राहयला जावं लागलं. मामा मावशीकडे राहायचं तर त्याकाळी म्हणजे साधारण १९५६-५७ साली घराच्या व शेतीच्या कामात हातभार लावायचा. मुलगी म्हटली म्हणजे शिक्षणाची जास्त आवश्यकता नाही. पण आईच मात्र उलटं होत. आईला शिकण्याची प्रचंड इच्छा होती. त्यामुळे घरची व शेतीची सर्व कामे सांभाळून वेळात वेळ काढून शिक्षण पूर्ण करायची आईने जिद्द बांधली होती व ती जिद्द आईने पूर्णदेखील केली. डी. एडपर्यंत शिक्षण पूर्ण केलं. त्याचदरम्यान आईचं लग्न झाल आणि पवारांची मुलगी देशमुखांची सुन झाली. लग्नानंतर काही काळ आईने शिक्षिकेची नोकरी देखील केली. परंतू एकत्र कुटुंबामुळे आईला जास्त काळ नोकरी करता आली नाही.

आईने नोकरी जरी सोडली असली तरी तिच्या पारिवारीक जबाबदाऱ्या कमी झाल्या नव्हत्या. सासु-सासरे, नणंदा, आम्ही तीन भावंडे, घरी येणारे पै पाहुणे यांची नेहमीच वर्दळ घरात असायची. आईने तिच्या सर्व नात्यांच्या जबाबदाऱ्या सांभाळून स्वत:चे छंद जोपासले. टाकावू वस्तूंपासून नवीन कलाकुसरीच्या वस्तू बनवून घर सजवणं, शिवणकाम-विणकाम हे तर आईसाठी आवडीच काम असायचं. यासर्व जबाबदाऱ्या पार पाडत असताना आईने मामांना डॉक्टर बनवून मोठ्या बहिणीची जबाबदारीसुध्दा पार पाडली.

आम्हा भावडांच्या शिक्षणासोबतच आईने आजूबाजूच्या मोलमजुरी करणाऱ्या लोकांच्या मुलांना देखील शिकवायला सुरूवात केली. पहाटे साडेचार वाजेपासून आईचा दिवस सुरू व्हायचा. त्यामध्ये घरातील कामे, आमच्या जबाबदाऱ्या येणाऱ्या पाहुण्यांकडे पाहणे आणि शिकवण्या तर होत्याच, एवढ सर्व करत आईचा दिवस रात्री १० ते १०.३० नंतर मावळायचा. पण आईचा उत्साह कधीच कमी झालेला मी पाहिला नाही. हे सर्व करताना आईला माझ्या वडीलांची साथ पाहिजे तशी तेंव्हा मिळाली नाही आणि आजही मिळत नाही. वडीलांचा स्वभाव कडक असल्याने आमचे सर्व लाड व हौसमौज आईनेच केली.

दरम्यान आम्ही तिघ भाऊ बहिणीनी आमची शिक्षणं पूर्ण केली. बहिणीला चित्रकलेमध्ये आवड असल्याने तिने बॅचलर इन फाईन आर्टस मध्ये डिग्री मिळवली. भावाने डि फार्मसी पूर्ण केले आणि माझे ग्रॅज्युएशन सुरू होते. बहिणीने फाईन आर्टसमध्ये डिग्री घेतली, नोकरीसाठी तिला बाहेरगावी जायची ईच्छा होती. पण वडीलांचा त्यासाठी सक्त विरोध होता. त्यावेळी तिने घरीच रांगोळी, पेंटींगचे क्लासेस सुरू केले. घरी बसूनच तिला फोटोशॉपची कामे करण्यासाठी कॉम्प्युटर घेणे आवश्यक असूनही वडीलांनी कॉम्प्युटर घेण्यासाठी विरोधच केला. त्यावेळी मात्र आई तिच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली आणि वडीलांना सांगितले, माझे पंख कापले तसे मी माझ्या लेकरांचे पंख कापू देणार नाही. त्यादरम्यान आईने बहिणीला ५० हजारांचे बँकेचे कर्ज काढून कॉम्प्युटर घेवून दिला. बहिणीला स्वत:च्या पायावर उभं केले.

काही महिन्यानंतर मुलगा दत्तक घ्यायचा किंवा कसे? असे अनेक प्रश्न आणि बोलणी आईच्या कानावर यायला लागली होती. त्यावेळी देखील आईने स्पष्टपणे सर्वांना सांगितले की, मी माझ्या मुलाप्रमाणे मुलींनादेखील जन्म दिला आहे. माझ्या मुली माझे दोन डोळे आहेत, त्यांच्यासाठी मला जगायचे आहे. दोन तिन वर्षांनी बहिणचे लग्न झाले, त्यावेळी आई घराच्या बाहेर पडली. मुलाच्या आघाताने आईची मनस्थिती खूप वाईट होती. तेंव्हा बहिणचे लहान बाळ देखील आईकडेच होते. त्याला जन्मत:च चालण्याचा प्रोब्लम असल्याने त्याची वयाच्या ४-५ वर्षांपर्यंत सर्व सुश्रुशा आईनेच केली. थोडे विस्मरण झाल्यासारखे वाटत असल्याने आईने स्वत:च स्वत:ची परीक्षा घेण्याचं ठरवलं आणि अपूर्ण राहिलेली बी.एस्सी. ॲग्रीची पदवी पूर्ण करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी पुन्हा नव्या उमेदीने फिनिक्स पक्ष्याप्रमाणे तयार झाली. पदवीची राहिलेली ३ वर्ष आईने डिस्टिंगशन घेवून उत्तीर्ण केली. त्यावेळी आईची शिक्षणातील एकाग्रता व चिकाटी पाहून मलादेखील लाज वाटली होती. आपण स्वत:ला तरूण म्हणवतो पण अभ्यासाची वेळ आली की, कंटाळा आधी येतो. नवीन अभ्यासक्रमाला सुरूवात करायची म्हटलं तरी नियमित शिक्षण घेतल्यानंतर आता आपल्याकडून हा अभ्यासक्रम पुर्ण होईल का? नियमित अभ्यासात खुप कालावधी गेला आहे अशा अनेक शंका आधी मनात येतात. पण वयाच्या ५६ वर्षी बी.एस्सी. ची डिग्री डिस्टिंगशन घेवून पास झाल्यानंतर मला आईचा तेवढाच अभिमान देखील वाटतो.

मी माझा पत्रकारितेचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर मला बाहेरगावी नोकरीसाठी पाठविण्यासाठी मला आईचा आणि मोठ्या बहिणीचा पाठींबा मिळाला. काही वर्ष कंत्राटपध्दतीवर नोकरी केल्यावर मी २००९ मध्ये मी शासकीय नोकरीत रूजू झाली. त्यानंतर काही महिन्यांनी मी आई वडीलांच्या विरोधात जावून प्रेम विवाह केला. आई वडील माझ्यावर काही काळ नाराज होते. पण मी घेतलेला निर्णय योग्य आहे हे कळल्यानंतर दोघांचा राग मावळला आणि आमचा स्विकार ही केला. मी आणि माझे पती आम्ही दोघेही शासकीय नोकरीत असल्याने आम्हाला आमच्या मुलांकडे पूर्ण लक्ष देणे शक्य नाही, हे लक्षात आल्यावर माझ्यासाठी आईच धावून आली. मुलांना मी जन्म जरी दिला असला तरी माझ्या मुलांसाठी माझी आई 'यशोदा' बनली. माझी दोन्ही मुले माझ्या आई वडीलांकडेच असतात. मुलांची खाण्यापिण्या पासून तर अभ्यासापर्यंत सर्व काळजी आई वडील घेतात. नातवंड असले म्हणून अगदीच लाडात वाढवायचे अस नाही तर प्रत्येक नात्यातील आदरयुक्त धाक देखील माझ्या मुलांमध्ये आहे. यातूनच माझ्या मुलांनादेखील आमच्याप्रमाणेच आयुष्यभर पुरणारी संस्कारांची शिदोरी आईकडून मिळते आहे. आजी आजोबांच्या प्रेमाच्या छायेत ते वाढत असल्याने खुप समाधान वाटते.

आईला फुला फळांच्या झाडांची आवड असल्याने गेल्या १५-२० वर्षांपासून घराच्या मागे व गच्चीवर साधारण २५० ते ३०० कुंड्यामध्ये आईने बाग फुलवली आहे. कुंड्या विकत महाग मिळतात म्हणून प्रत्येक रोपासाठी कुंडीच पाहिजे असे

नाही, तर टाकावू वस्तूंचा रोपे लावण्यासाठी कसा उपयोग करावा हे आईकडून शिकाव. छोट्या छोट्या गोष्टीत कसे पैसे वाचवता येतील याचाही ती खूप बारकाईने विचार करत असते. यातूनच आई आजही घर आणि बाग सुशोभित ठेवते. आई त्या बागेची आजदेखील अगदी पोटच्या मुलांप्रमाणे काळजी घेत असते.

घरकामासाठी बाई लावणे ही आजच्या काळात प्रत्येक घराची गरज झाली आहे. मग घरातील स्त्री नोकरीला असो वा नसो, घरात कपडे धुण्यासाठी मशिन तर आहेत, शिवाय भांडी, झाडझुड, फरशी पुसणे अशा कामांना बाई लावायची. याला मीही अपवाद नाहीच. नोकरी करणाऱ्या महिलांसाठी ती आजची गजरच झाली आहे. पण आजही वयाच्या ६५ व्या वर्षी आईकडे घरातल्या कोणत्याही कामाला कामवालीबाई नाही. घरातील सर्वच कामे अगदी धुणी, भांडी, झाडझुड, फरशी पुसणे अशी सर्वकामे आई स्वत: करते. त्यामुळे आईच्या मागचा सर्व व्याप पाहून कधी कधी मनात प्रश्न येतो की, आपण आईच्या वयाचे झाल्यावर इतके ऍक्टीव राहू का? दर महिना पंधरा दिवसांनी आईकडे गेले तर आई कधीच शांत बसलेली दिसणार नाही. आईला बघितल्यावर एक नवी उमेद आणि प्रेरणा मिळते. आमच्या आयुष्यातला आईरुपी दिपस्तंभ असा कायमस्वरूपी आमच्या सोबत राहवा, अशीच प्रार्थना मी नेहमीच करत असते.

हंबरून वासराले पाजती जेंव्हा गाय
तव्हा मले तिच्यामंधी दिसती माझी माय

कवितेच्या ह्या दोन ओळींप्रमाणेच प्रत्येकाला आपली आई असते. संकटात धावून येणाऱ्याचे आपण उपकार मानत असतो, पण आई अशी व्यक्ती असते जिने आपल्याला ह्या जगात आणलेले असते, तिचे उपकार आपण कधीच फेडू

महिलांनो
तुमच्यासाठी ...

# अटकेसंबंधी महिलांचे अधिकार...

* महिलांना फक्त महिला पोलिस सूर्योदयानंतर आणि सुर्यास्तापुर्वी अटक करू शकतात.
* कुटूंबाच्या सदस्यांच्या उपस्थितीत योग्य कारण असेल तरच स्त्रीला पोलिस ठाण्यात चौकशीसाठी बोलावता येते.
* स्त्रीला अटक केल्यास तिला फक्त महिला कक्षामध्येच ठेवता येते.
* महिलांच्या तक्रारीचे स्वरूप असेल तर पोलिस एफआयआर दाखल करतात.
* एफआयआर दाखल केला, तर त्याची प्रत देणे पोलिसांवर बंधनकारक आहे.
* सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयापुर्वी कुठल्याही महिलेला पोलिस ठाण्यात चौकशीसाठी थांबवुन ठेवता येत नाही.
* पोलिस ठाण्यात महिलेची चौकशी सुरू असेल, तिथे महिला कॉन्स्टेबल असणे अनिवार्य आहे.
* महिला आरोपीची वैद्यकीय तपासणी महिला डॉक्टर करील किंवा महिला डॉक्टरच्या उपस्थितीत पुरूष डॉक्टर करू शकेल.
* कुठल्याही महिला साक्षीदाराला पोलिस ठाण्यात येण्याची सक्ती करता येणार नाही. गरज भासल्यास पोलिस तिच्या घरी जातील .

## लेखकांसाठी सुचना

१. लेखांचा विषय प्रचलित आणि संक्षिप्त असणे आवश्यक आहे.
२. प्रकाशित करणाऱ्या येणाऱ्या लेखांची शब्दमर्यादा १००० ते २००० असावी आणि लेख संगणकीकृत करून shikshanyatri11@gmail.com, pragatiartsshirpur@gmail.com या मेलवर पाठवावी.
३. संगणकीकृत केलेल्या मुद्रित अक्षरांसाठी (श्रीलिपी देव ७०८) Shree lipi- Dev708 /google marathi/ mangal font फॉन्ट साईज १५ असावे.

**संपर्क :शिक्षणयात्री क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे चलभाष :** 8208301001 shikshanyatri11@gmail.com



# नास्ति मातृसमा गतिः



तृप्ती अरूण पोवार
मंत्रालय लिपिक,
जलसंपदा विभाग, मुंबई
triptikadar700@gmail.com

**जेव्हा आमचं कुटूंब वेगळं निघालं तेव्हा तिला भविष्यातील कष्टाची जाणीव होती. कारण एकत्र कुटुंब होते तो पर्यंत शेताच्या कामांची चिंता नव्हती. आता वेगळ निघाल्यावर शेती आम्हालाच करावी लागणार होती. वडिल तर नोकरीनिमित्त बाहेरगावी जात. याचा थोडादेखील परिणाम तिनं स्वत:वर केला नाही. आत्मविश्वासू होती .जिद्दी होती. शेती उत्तम सांभाळली. आम्हा मुलांसारखच तिचं शेतीवर प्रेम. शेतीचं कौशल्य तिनं लवकरच मिळवलं. आणि आलेल्या उत्पन्नावर ती स्वत:चा हक्कही कधी दाखवत नसे. ती उत्कृष्ट शेतकरी असल्याचा आम्हाला अभिमान वाटे नि आजही आहे. वास्तविक बाबांची जबाबदारी स्वत: घेतल्याने तिला कमी पणा वाटत नव्हता.**

'आ' म्हणजे आत्मा आणि 'ई 'म्हणजे ईश्वर. स्वत:च्या आत्म्यापासून ईश्वरापर्यंत प्रेम करणारी व्यक्ती म्हणजे 'आई '

प्रत्येकाच्या जीवनात आईचा अनमोल ठेवा जपून असतो नव्हे तर या ठेव्यास कुबेराच्या संपत्तीबरोबर सुध्दा तुलना करता येत नाही. आईची निरनिराळी रूपे... निराळ्या छटा मुलं अनुभवतात. कधी रागीट तर कधी प्रेमळ असे विविध स्वभाव पैलू देखील जाणतात. आईची अशी विविध रूपे ह्दयाच्या गाभाऱ्यात जपलेल्या असतात. नेमकी आई. कशी ? याचे वर्णन करणे म्हणजे अथांग महासागराचा तळ गाठण्यासारखे आहे.

माझी आई वंदना पाटील शिक्षण कमीच जेमतेम दहावी वर्गापर्यंत शिकलेली. तिच्या माहेरची परिस्थीती बरी पेक्षा चांगली होती. वडील आईसह एक बहिण नि एक भाऊ.

वयाच्या अठराव्या वर्षीच आईचं लग्न झालं माहेरची वंदना चंदर पाटील लग्नानंतर अर्चना अरूण पोवार झाली. सासरी एकत्र कुटूंब. त्यामुळे आईला सुरूवातीला जुळवून घेण्यात अडचणी येत. कामं जड वाटीत. मात्र आई. जिद्दी स्वभावाची होती. तिने स्वत:ला सावरत कुटूंबाची जबाबदारी सांभाळली. वडिल पेशाने शिक्षक. ते नेहमीच बाहेरगावी असत.त्यामुळे आम्हा भावंडाना दोन बहिणी एक भाऊ  सांभाळणे त्यांचे संगोपन–शिक्षण सारे काहीच तिच पाहत असे. त्यात ती कधीच कमी पडली नाही. आणि आजही तिचं लक्ष आम्हा भावंडावर तेवढयाच सतर्कतेने आहे.

आमचं गाव आकुर्डे (भुदरगड) कोल्हापूर मधील लहानसे .खेडेगाव. खेड्यातील वातावरण विशेषत : महिलांच्या बाबतीत थोडं कठोरच असते. अनेक बंधने मुलींवर असत . मुलींनी हे करा ते करू नका अशा अनेक बाबीत मोठ्यांचा धाक असे. पण आईने मात्र या चौकटीपलीकडे आम्हाला वागवलं. धाडसी निर्णय घेण्यास तिने कधी आडकाठी आणली नाही. नेहमी प्रोत्साहनच दिले. लहानपणीचा एक प्रसंग आठवतो. गावातील मुलं सायकल घेऊन तालुक्याच्या ठिकाणी शाळेला जायची. माझ्या मुलीने देखील सायकल चालवावी असं तिला वाटे.

लगेच तिने बाबांना सायकल आणायला सांगितले. आणि सायकल आणल्यानंतर स्वत: आई सायकल धरून आम्हाला शिकवायची. एन.सी.सी त सहभाग असो कि नेमबाजी, कबड्डी सारखे खेळ खेळणे असो, आईने कधीच थांबवले नाही. नव्हे तर स्वत:हून आग्रहाने सहभाग घ्यायला लावला. सभोवतालच्या स्त्रियांचा मुलींबाबतीत, शिक्षणाबाबत असलेला संकुचित विचार तिला कधीच आवडला नाही.

वडील शिक्षक होते मात्र त्यांना पगार मिळत नव्हता. बारा वर्षे त्यांनी विना पगाराची काढली. यावेळी कुटूंबाची होणारी ओढाताण वडिलांबरोबर आईला सहन करावी लागे. तिनं वडिलांना कधी एकटं वाटू दिलं नाही की या आर्थिक्र अडचणीचा बाऊ केला नाही. आहे त्या परिस्थीतीत जमेल तसं, काटकसरीने तिनं संसाराचा गाडा ओढला. स्वत:साठी काही अपेक्षा न करता आम्हा भावंडासाठी काही कमी पडू दिलं नाही. एकत्र कुटूंबातील सदस्यांची बोलणी तिने कधीच मनावार घेतल नाही. उलट स्वत:च्या वाटयाला कष्टच ओढून घेत राहिली.

आमच्या घरात बोलण्याचं स्वातंत्र्य होतं.आमचं मत मांडता येत होतं. बोलतांना तिनं कधीच थांबवल नाही. आमचं ऐकूण घेत योग्य तो सल्ला देत असे. एखाद्या जिवाभावाच्या मैत्रीणीप्रमाणे तिचं मत आम्ही घेत असू. यामुळे कधी वाहत जाण्याचा धोका आम्हाला वाटला नाही.

घरात वागतांना आई शिस्तीत वागवायची . घरकाम करून तुमचा अभ्यास नि खेळ करा. असं सांगायची ती आम्हा भावंडाना कामे ठरवून द्यायची. आधी ठरवलेले काम करा मग नंतर तुम्ही अभ्यासाला , खेळायला मोकळे. मी जेव्हा स्पर्धापरिक्षांच्या अभ्यासाला तालुक्याच्या ठिकाणी जायचे तेव्हा देखील आई अगोदर घरातील कामे करायला लावायची. मगच अभ्यासाला पाठवयाची. मला खूप राग येई. पण आज त्या संस्काराचे मोल समजते. आईची शिकवण आमच्या भविष्यासाठी महत्वाची होती.

मी जेव्हा नोकरीनिमित्त मुंबईला आले व त्यानंतर लग्न होऊन पुणे –मुंबई प्रवास करावा लागला तेव्हा आईच्या शिकवणीनेच अडचणीवंर मात केली. घरातील कामे उरकून नोकरी करण्याची शिकस्त करण्यात होणारी कसरत मोठी असते. कधी कधी नोकरी सोडावी असा विचार मनी येई .परंतू आईचे एक वाक्य आठवे, ''माझ्या मुलींनी घरकाम आणि नोकरी या गोष्टी सांभाळता येत नाही या कारणास्तव त्रास करून घेऊन नोकरी सोडलेली चालणार नाही '' त्यापेक्षा कामात बदल करून मन रिझवण्याचे ती सांगे.

आईच्या संस्काराचे बळ मला यशस्वी जीवन जगण्यास पुरेसे आहे. आणि आज जे काही समाधानाचे क्षण अनुभवते तेव्हा आईच्या समाधानाची आठवण होते. ज्यांचे आईवडिल समाधानी असतात. त्यांची मुलेही समाधानी असतात. माझ्या यशस्वी आणि समाधानी जीवनाचे सार माझ्या आईच्या संस्कारात असावे. तिच्याविषयी एवढे म्हणेन,

दास्तान मेरे लाड प्यार की बस
एक हस्ती के लिए इर्द गीर्द घुमती है
प्यार जन्नत से इसलिए हे मुझे
क्योंकि ये भी मेरी माँ के कदम चुमती है

**महिलांनो**
**तुमच्यासाठी ...**

# महिलांसाठी योजना...

**निराश्रित महिलं, किशोरवयीन माता, अत्याचार पिडीत महिलं यांच्यासाठी राज्य महिला गृहे (वय गट १८ते ६० वर्षे)**

**शासन निर्णय दि.३ फेब्रुवारी २०१४ संकेतांक क्रं – २०१४०२०४१४३४२७७५३०**

* महिलांना वास्तव्याकरिता सुरक्षित आणि संरक्षित वातावरण आणि मुलभूत सुविधा पुरविण्यात येतात. पिडीतांचे विवाह आणि रोजगार यांच्याद्वारे पुनर्वसन सुनिश्चित केले जाते.

*लाभार्थीचे राज्यात एक महिना वास्तव्य झाल्यानंतर प्रती लाभार्थी १००० रूपये, ५०० रूपये तिच्या पहिल्या मुलांकरिता आणि ४०० रूपये तिच्या दुसऱ्या मुलाकरिता मासिक अनुदान स्वरूपात देण्यात येतात.

राज्य महिला गृहे (प्रत्येक ठिकाणी १) पुणे, बारामती,सातारा,कोल्हापूर,सोलापूर,मुंबई,ठाणे,सिंधुदुर्ग, रत्नागिरी ,औरंगाबाद, जालना, नांदेड,लातूर,अकोला,जळगाव,नाशिक,धुळे जिल्ह्यामध्ये स्थापित करण्यात आलेली आहेत.

**महिला दिन विशेष**

# आई समजून घेतांना ...






डॉ.रजनी लुंगसे
एस.पी.डी.एम.कॉलेज,शिरपूर जि.धुळे
चलभाष : ९७६३२३६४२२

**आई ह्दयाची संवेदना असते. ज्यांनी आईला पाहिले, तिचे प्रेम अनुभवले , तिच्या अनुभवले, तिच्या वास्तल्यात ते न्हाऊन निघाले, प्रसंगी तिच्या हातचा मारही खाल्ला ते सर्व भाग्यवान म्हणू या. पण जन्म होता बरोबर आईपासून जे दूर गेले, काही परिस्थितीने दुर झाले अशा अभागी जीवांना आई शोधायची असेल तर उत्तम कांबळेंच्या या पुस्तकातून ती नक्कीच भेटेल इतके प्रभावी असे हे पुस्तक आहे.**

आई समजून घेणे हा वाटतो तितका साधा व सोपा तसेच अत्यंत दुर्गम, कठीण पातळीवरचा विषय नाही. तर तो जीवनाचे समतोलत्व शिकविणारा विषय आहे. ज्याने हा प्रयत्न केला त्याला मी माझ्या परिभाषेत 'सलाम' करू इच्छितो आणि तो प्रयत्न उत्तम कांबळेंच्या आत्मकथनाने सुरू झाला. समाजात चर्चा होऊ लागली. वाचकाला आईकडे पाहण्याची, तिच्या अंतर्मनात डोकवण्याची एक वेगळी दृष्टी मिळली तसे पाहता प्रत्येकाची आई वेगळीच असते. कोणीही तिचे मूल्यमापन करायला गेला तर अपूर्णच होईल. साहित्य. विश्वातील मॅक्झीम गॉर्कीच्या आईपासून, साने गुरूजींच्या श्यामची आईपर्यंत, कष्टकरांच्या आईपासून तर सम्राटाच्या आईपर्यंत आई वेगवेगळीच असते, परंतू आईचे प्रेम सारखे असते.

आई समजून घेतांना या आत्मकथनातील वैचारिकतेचा पहिला प्रभाव पडतो तो तीळाच्या गोष्टीवरून

**तीळाची गोष्ट पारदर्शी सत्य -**

उत्तम कांबळे यांना त्यांच्या आईच बोलण नेहमीच नकारार्थी वाटत असे. आईच्या तोंडूनही साध्या प्रश्नाच उत्तर कधीही सरळपणे येत नसे. ते आईला विचारात जेवलीस का ? आई म्हणत असे, ढकलले दोन तुकडं पोटात. कशी आहेस ? कसचं काय, मरण जवळ आलंय. तब्येतीची काळजी घे. तर म्हणे आता काय मढं राहिलंय, माझ्या मढयावर पैसे खर्च करण्यापेक्षा थोडं भावाला दे. आईचा हा सुर उत्तम कांबळे यांना वेगळाच वाटत असे पण त्यामागे दडलेली असायची तिळाची गोष्ट प्रत्येक जण तिळापासून दूर जाऊ इच्छितो, प्रत्येक आईला ही गोष्ट आवडते. पण आईने मात्र तिळाची गोष्ट आयुष्यभर जपायला शिकविले.

**जीवनातले युध्द आणि पुस्तकातला बुध्द -**

उत्तम कांबळे यांनी त्यांच्या मुलाला भारी पॅन्ट आणली तेव्हा आईला वाटत होते की, जरा कमी किमतीची पॅन्ट आणली असती तर गावाकडील नातवंडाचाही विचार झाला असता. जास्त मटन आणले, आंबे खूप आणले की आई रागवायची एवढ कशाला आणलं. उत्तम कांबळेंना आई भुतकाळतील परिस्थीतीत न्यायची आणि उत्तम कांबळे त्या काळयाकुट्ट अंधारातून निघून सुटका करू पाहत होते. त्यांना भुतकाळात भाकरीच्या तुकड्यासाठी व्यक्त झालेली लाचारी दिसायची. महालढाई दिसायची. खपली पडून जखम वाहतांना दिसायची. सणावाराला सवर्णांच्या दारात उभे राहून भीक मागायला उभे राहणे, त्यांच्या अंगावर गल्ली बोळातून धावणार कुत्र दिसायचे. आणि आक्का पुन्हा पुन्हा त्याच भुतकाळात ढकलायची पण का ? याचे उत्तर त्यांचेकडे नव्हते. तेव्हा ते शांतपणे स्वत:ला आवर घालण्यासाठी बुध्द वाचत बसायचे. माणसाच्या दु:खाचा उगम कसा व का होता ? माणसाच्या वाढत्या

दु:खाला जबाबदार कोण ? याचे उत्तर बुध्दाच्या विचारात उत्तम कांबळे यांना सापडायचे पण जीवनातले युध्द मात्र संपणार नाही याचीही जाणीव व्हायची एक विलक्षण व्दंद्व त्यांच्या मनात सुरू असायचे. बुध्दाचे तत्वज्ञान पुस्तकात चांगले होते. पण मानवी मनाच्या संघर्षात जीवनातले युध्द मोठे वाटायचे तेव्हा आक्का भांडखोर वाटायची घराघरातून सुरू असणारे हे द्वंद्वच कुठेतरी थांबायला हवे ते थांबले तरच बुध्दाच्या जवळ जाता येते. म्हणून जीवनाच्या युध्दावर पुस्तकातला बुध्दच विजयी केला तरच पुढचा मार्ग मिळू शकतो हे तेथे शिकायला मिळते. ही वैचारिकता आयुष्यभराच्या यशाची ठेव असते.

**रोजची लढाई -**

उत्तर कांबळे लिहितात, भाकरी मिळविण्याच्या प्रयत्नांमुळे आम्ही बऱ्याचवेळा तिच्यापासून दूर फेकलो जायचो. आई सकाळी लवकर उठून स्वयंपाक करून रोजगाराला जायची. येतांना डोक्यावर लाकडाची मोळी, पैसे मिळाल्यावर ज्वारी आणून ती दळायची काखेत हंडा व डोक्यावर दळण, घरी आल्यावर रात्रीचा स्वयंपाक व दुसऱ्या सकाळची तयारी करून सर्व आवरून रात्री थकल्यावर पाय पोटात घेऊन झोपायची. ही लढाई रोजचीच होती. या तीव्र  लढाईमुळे तिने अन्य आयांप्रमाणे कधी कुशीत घेतल्याचे, पटापट मुके घेतल्याचे आठवत नाही. अंगाई ऐवजी युध्दगाणीच होती . मांडीवर डोकं ठेवून झोपायची इच्छा झाली की, मावशीचा शोध सुरू व्हायचा जेव्हा उत्तम कांबळेची मुले त्यांच्या आईच्या मांडीवर डोक टेकवून झोपायची तेव्हा लेखकाच्या मनात प्रचंड कालावाकालव व्हायची  त्यांचा हेवा वाटायचा. या रोजच्या लढाईतून कितीतरी डॉक्टर्स, इंजिनिअर्स, साहित्यिक, प्रतिष्ठित भुतकाळातून भविष्याकडे आले असतील. या सर्वांची आई उत्तम कांबळेंनी पुन्हा भविष्यकाळात जिवंत केली पून्हा ते माय लेकरांचे उमाळे दाटून आले. या दृष्टीने आई समजून घेतांना मधील वैचारिकता शाब्दीक मांडणी नसून अनुभवलेल्या दु:खाच ती एक जखम होती आणि त्यावरची फुंकर होती. काळापेक्ष मोठे औषध कोणतेही नाही.

**मोलकरीण माणूस नाही का ? -**

उत्तम कांबळे यांची आई त्यांच्या जवळ ऱ्हायची पण तिचे मन मात्र गावाकडे असायचे आणि गावाला गेली की उत्तम कांबळे यांच्या मुलांमध्ये असायचे. मुले शाळेत गेली की, तिला एकटीला करमत नसे. याबाबतची एक अखंड वेदना तिच्या चेहऱ्यावर दिसायची. ती व्यक्त करण्यासाठी आई शेजारी किंवा मोलकरणीकडे जात असे. रात्री उशिरापर्यंत घरी परतायची. या तिच्या वागण्याचा उत्तम कांबळे यांना खूप राग यायचा. त्यांच्यामते ही खोट्या प्रतिष्ठेची झूल होती. पण अक्का मात्र पहिल्याच वर्गात होती. हा पहिलीचा वर्ग होता माणूसकीचा उत्तम कांबळे आईला विचारत, तू मोलकरीणीच्या घरी का गेलीस ? तर आक्का म्हणायची, मोलकरणी माणूस नाही का? आक्काच्या प्रश्नाला उत्तम कांबळेच काय? इतर कोणत्याही विचारी माणसाकडे उत्तर नाही. कारण प्रत्येकजण कुटूंब, समाजव्यवस्था, प्रतिष्ठा, खोटी दांभिकता या द्वंद्वामध्ये अजूनही लढाच देत आहे.

**आई एकदाच मिळते -**

उत्तम कांबळे लिहितात, मी जसा जसा शिकू लागलो तसा नशिबाच्या गावातून बाहेर पडू लागलो. शहाणपणाच्या ज्ञानाच्या गावात फिरू लागलो. माझीही मत तयार होवू लागली. अनेकदा माझ्या आणि आक्कांच्या मतांत टकराव व्हायचा, ठिणग्या उडायच्यात आई स्वत:च्या मनाला येईल तसेच वागते. स्वत:ला शहाणी समजते असे उत्तम कांबळे यांना वाटायचे कधी-कधी ती तिच्याशी बोलणही बंद करायचे. वर्षभर उत्तम कांबळे चुलत्याकडे राहिले. तेव्हा आई कधी गोड धोड केले की, निरोप द्यायची व म्हणायची, आपली आई अडाणी आहे शाळेत गेली नाही, पुस्तक वाचून तिच्याशी भांडू नको म्हणाव त्याला...

पुस्तक वाचूनच आपला मुलगा आपल्याशी भांडू लागला असे त्या माऊलीला वाटे.

आईला टी.बी.आहे हे समजल्यावर दोघेही पती-पत्नी आणि मुले यांनी आईला आनंदी ठेवण्याचा केलेला प्रयत्न निश्चितच शिकण्यासारखा आहे. आजाराचे आईला समजल्यावर सर्वांपासून दूर जाण्याचा प्रयत्न ती करते. परंतु सर्वांनी मात्र तिला आपलेपण दिले आहे. तिची काळजी घेतली आहे. पण एवढे असूनही हा विषय येथे समजत नाही. एवढे मात्र खरे आई समजून घेतांना सर्वांनी याचा विचार निश्चितच करावा इतका सुंदर हा विषय आहे. या आत्मकथनातील प्रत्येक शब्द मनाच्या गाभाऱ्यातून निझाल्यामुळे यात कुठलीही कृत्रिमता नाही. म्हणून सर्वांनीच हे आत्मकथन निश्चितच वाचन करून चिरकाल स्मरणात ठेवावे.

महिला दिन विशेष

# भंवरी देवीच्या निमित्ताने... विशाखा मार्गदर्शक तत्त्वे!



सी.जी.कुवर(सत्तेसा)
आर.सी.पटेल,आश्रमशाळा, वाघाडी
ता.शिरपूर जि.धुळे
चलभाष: ९६७३४४४९७७

विशाखा मार्गदर्शक तत्वे ही भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने स्त्रियांना कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाच्या अनुषंगाने घालून दिलेली वजही मार्गदर्शक तत्वे आहेत. ही तत्वे भारताच्या सर्वोच्य न्यायालयाने राजस्थान मधील भँवरीदेवी या महिलेवर कामाच्या ठिकाणी झालेल्या लैंगिक अत्याचारानंतर घालून दिली.

**पार्श्वभुमी**

इ.स. १९९० साली राजस्थानमध्ये काही उच्चजातीय जमीनदारांनी भँवरीदेवी या दलित महिलेवर सामुहिक बलात्कार केला. राजस्थान सरकारच्या योजने अंतर्गत अल्पवयीन मुलींचा विवाह करू नये. म्हणून भँवरीदेवी गावकऱ्यांचे प्रबोधन करण्याचे काम करत होत्या मात्र गावच्या जमीनदारांना ते रूचले नाही व त्यांनी भंवरीदेवीवर बलात्कार केला न्याय मिळविण्यासाठी तिने न्यायालयाचे दरवाजे ठोठावले परंतू न्यायालयाने तिच्या विरोधात निकाल दिला. दलितांना उच्चजातीय शिवत नाहीत. त्यामुळे उच्चजातीय जमीनदारांनी दलित भंवरीवर बलात्कार करणे शक्य नाही असे न्यायालयांने आपल्या निकालात म्हटले. या निकालाच्या पार्श्वभुमीवर स्त्रियांसाठी काम करणाऱ्या 'विशाखा 'नावाने सर्वोच्च न्यायालयात जनहितार्थ याचिका दाखल केली. या याचिकेवर इ. स. १९९७ साली सर्वोच्च न्यायालयाने जो निकाल दिला तो निकाल म्हणजेच 'विशाखा निकाल 'किंवा 'विशाखा मार्गदर्शक तत्वे 'होत.

विशाखा याचिकेवर निकाल देतांना सर्वोच्च न्यायालयाने कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळ याची दिलेली व्याख्या –

१) कोणताही अस्वागतार्ह शारिरीक स्पर्श

२) शरिरसंबंधाची मागणी किंवा विनंती

३) लैंगिकता सुचक शेरे मारणे व अश्लिल बोलणे

४) कामुक व अश्लिल चित्रे दाखविणे किंवा एसएमएस ईमेल करणे.

५) लैंगिकता सुचक कृती शारिरीक मौखिक किंवा नि:शब्दपणे केलेली अन्य कोणतीही कृती .

**मार्गदर्शक तत्वे**

*नोकरी व व्यवसायाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणूक होवू न देण्याची जबाबदारी ही तेथील वरिष्ठांची मालकाची किंवा अधिकाऱ्याची असेल.

*सर्व सरकारी व निमसरकारी अथवा खाजगी कामाच्या ठिकाणी 'लैंगिक छळवणूक' म्हणजे काय याची माहिती कामकाजाच्या ठिकाणी लावण्यात यावी व सर्व कर्मचाऱ्यांपर्यंत ती पोहचेल अशी व्यवस्था करावी.

*जर लैंगिक छळवणुकीची घटना ही फौजदारी गुन्हा होत असेल तर संबंधित अधिकाऱ्यांनी किंवा वरिष्ठांनी योग्य त्या ठिकाणी याची तक्रार इतर नोंदवावी पण त्याच बरोबर पीडित महिलेस सर्व सुरक्षा पुरवावी.

*पिडीत महिलेस तिच्या इच्छित ठिकाणी बदली करून द्यावी व संबंधित आरोपी कर्मचाऱ्याविरूध्द नियमा प्रमाणे शिस्तभंगाची कारवाई सुरू करावी.

*सर्व सरकारी,निमसरकारी खाजगी तसेच सार्वजनिक क्षेत्रातील कार्यालयात महिलांच्या होणाऱ्या लैंगिक शोषणाची तक्रार ऐकून निवाडा देण्यासाठी एक तक्रार निवारण मंच वा समिती असावी. व त्यात ५० टक्के सदस्य महिला असाव्यात, स्वयंसेवी महिला संघटना, महिला आयोग यांचे प्रतिनिधी असावेत. तसेच कायदे तज्ञ ,तक्रार करणारी व ज़्यांच्याविरूध्द

तक्रार आहे तो पुरूष या दोघांच्याही खात्याचे प्रमुख त्या कमिटीत असावेत व स्त्रियांनी या कमिटीकडे आपली तक्रार मांडावी. या मंचापुढे जेव्हा एखादी महिला आपल्या शोषणाबद्दल लेखी तक्रार करेल. याद्वारे सत्य शोधण्याचा प्रयत्न करतील. व दोषी ठरलेल्या कर्मचाऱ्याची पगार वाढ थांबविणे किंवा त्याची शिक्षा तत्वावर बदली करणे अशा प्रकारच्या शिक्षा देवून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतील. येथेही महिलेला न्याय न मिळाल्यास ती राज्य महिला आयोगाकडे किंवा न्यायालयात दाद मागू शकेल.

* जर एखाद्या नोकरदार महिलेने बाहेरील व्यक्ती विरूध्द कामकाजाच्या ठिकाणी लैंगिक छळवणुकीची तक्रार केली तर अशा व्यक्ती विरूध्द जरूर ती सर्व कायदेशीर कारवाई करण्याची व पीडित महिलेस सर्व मदत करण्याची जबाबदारी ही मालकांवर किंवा अधिकाऱ्यावंर राहिल.

* आज 'मी टू' माध्यमातून महिला कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक अत्याचारा विरूध्द आवाज उठवित आहेत. याच सगळं श्रेय जयपुरच्या भंवरीदेवीला जाते. २६ वर्षीपुर्वी सामुहिक बलत्काराची बळी पडलेली भवरीदेवीच्या घटने नंतर सर्वोच्च न्यायालयाने कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळासाठी 'विशाखा गाईडलाईन 'सुरू झाली याच्यासाठी भवरीदेवीने व महिला जनसंघटनांनी ५ वर्षे संघर्ष केला. आश्‍चर्याची गोष्ट म्हणजे देशातील करोडो महिलांचा आवाज बनलेली भवरीदेवी स्वत: २६ वर्षापासून न्यायासाठी भटकत आहे. आता ती ५८ वर्षाची आहे.

भवरीदेवीवरच गावातील लोकांनी बहिष्कार टाकलेला आहे. तिला कोणत्याही सामाजिक कार्यक्रमात व लग्नसमारंभात देखील बोलावले जात नाही, ही शोकांतिका आहे.

महिलांनो
तुमच्यासाठी ...

# महिलांसाठी योजना...

**बलात्कार आणि ॲसिड हल्ल्यातील पीडीत महिला व बालके यांच्या पुनर्वसनासाठी आर्थिक सहाय्य पुरविणे या साठी महाराष्ट्र शासन कडून मनोधैर्य योजना.**

**शासननिर्णय दिनांक - ३०/१२/२०१७ संकेतांक - २०१८०१०५१७४०३६३०३०**

*बलात्कार आणि हल्ला पिडीतांना (महिला आणि बालक) झालेल्या मानसिक आघातून सावरणे सर्वात महत्वाचे असते. त्याच बरोबरीने त्यांना निवारा, आर्थिक मदत, वैद्कीय आणि कायदेशीर मदत तसेच समुदपेशन सेवा उपलब्ध करून देणेही महत्वाचे असते.

*हे लक्षात घेऊनच राज्यातील महिला आणि बाल विकास विभाग मनौधर्य योजनोची अमंलबजावणी करीत आहे. याद्वारे पिडीतांना १ लाख रूपयांची आणि विशेष प्रकरणांमध्ये १० लाख रूपयाची आर्थिक मदत देण्यात येते. पिडीतांचे आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांचे पुनर्वसन करण्यासाठी आवश्यक असा निवारा, समुपदेशन, वैद्यकीय आणि कायदेशीर मदत, शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते.

* माननीय उच्च न्यायालय निर्देशानुसार योजनेच्या आर्थिक निकषामध्ये बदल करून सुधारित मनोधैर्य योजना लागू करण्यात आली आहे.

* सिंगल विंडो सिस्टिम : या योजनेंतर्गत अर्ज स्वीकारण्यापासून ते आर्थिक सहाय्य पुरविणे याबाबतची सर्व प्रक्रिया राज्य/जिल्हा विधि सेवा प्राधिकरण याना हस्तांतरण करण्यात आली आहे.

* IPTA अधियिम अंतर्गत मुलींचा समावेश - सुधारित योजनामध्ये IPTA अधिनियमांतर्गत सुटका करण्यात आलेल्या मुलींनाही सहाय्य करण्यात येते.

*** संकलन- सोनिका संदेश हजारे**

महिला दिन विशेष

# स्त्री शक्ती तुला नमन...



**मनोरमा ओगले**
श्री संत गाडगे महाराज हिंदी विद्यालय,
भुसावळ जि.जळगांव

जिु जिथे नारीचा सन्मान होतो, तिथे तिथे प्रत्येक ठिकाणी प्रगती निश्चित आहे. प्रत्येक कार्याची वृध्दी झालेली आढळून येते. आज संसारात म्हणजे विश्वात नारी जागर, नारीचे महत्व, नारीशक्ती यावर जास्तीत जास्त विचार केला जात आहे. कुटूंबात जर नारी शिक्षित असेल तर संपुर्ण कुटुंब सुशिक्षित होते. नारीचे अनेक विविध रूपे आपणास पहायला मिळतात. जसे की एक कन्या एक किशोरी , एक युवती, एक प्रौढ आणि एक वृध्द महिला. या विविध रूपातून ती कधी पुत्री कधी बहिण, कधी आई,कधी पत्नी, मैत्रीण अशा विविध नात्यांची गुंफण सतत साकारत असते. नारी म्हणजे त्याग, समर्पण याच उत्कृष्ठ उदाहरण आहे. कारण ती एक पुत्री, आई बनून तर एक पुत्नी आणि बहिण बनून घरातील फुलदाणी प्रमाणे घर प्रसंन्न ठेवते. पत्नी आणि आई बनून घराला घरपण देऊन ममतेचे, वात्सल्याचे पांघरूण घालून घर प्रफ्फुलीत करते. सगळयांना आपलेसे करते, मायेची ऊब देते. प्रेम वात्सल्य, आपुलकी, स्नेह, करूणा, या सर्वगुणांना सदगुणांना लेवून ती स्वत:चे समर्पण करते. ती सर्वांची जीवनदायिनी आहे. मी तर असं म्हणेन की राष्ट्र समाज आणि विश्वाची जननी आहे.

प्राचीन काळापासून सृष्टीच्या गतक़ाळातही महिलांना उच्च प्रतीचा सन्मान दिला जात असे. वेदकाळातही एक सिध्दांत महिलांना श्रेष्ठ मानले जायचे. तिच्याकडे आदराने पाहिले जायचे. स्त्रीला जन्मदायिनी, सुखसमृध्दि देणारी विदुषी, उर्जा तेज देणारी अशा आदर्श स्वरूपात पाहिले जायचे. नारी एका समाजाचीच नव्हे तर देशाची निर्मिती आहे. आजची नारी कुठलेही क्षेत्र असो मागे नाही. धार्मिक,सामाजिक,राजनैतिक अशा विविध क्षेत्रात आपल्या सदगुणी सुलक्षणी रूपाने आपले स्थान राखले आहे. वैदिक काळानंतर स्त्रीला काही अनिष्ठ बंधनाना सामोरे जावे लागले. अनेक वर्षे संघर्ष करावा लागला. तिच्याकडे कुठल्याही गोष्टीसाठी आक्षेपार्ह दृष्टीने पाहिले जायचे. अनेक बंधने आणि जबाबदाऱ्यांनी तिला जखडून ठेवले होते. आणि पुरूषप्रधान संस्कृतीच्या श्रृंखलांमधून तिची सुटका होणे अशक्य होते. पुरूषांनी तिला लाचार,अबला आणि संपुर्णपणे परावलंबी बनविले तिथुनच स्त्री ही अबला बनून समाजात मागे पडत राहिली. परंतू शिक्षणाच्या अदभुत शक्तिने तिच्यावरील संक़ट दूर केले याचे श्रेय फक्त आणि फक्त फुले दांपत्यांनाच दिले गेले पाहिजे. फक्त 'चुल आणि मूल 'या म्हणी प्रमाणे तिचे विश्व आबाधित न राहता महात्मा ज्योतिबा फुलेंसारख्या दैवी पुरूषांनी काळाचा महिमा बदलला व शिक्षणाची दालने स्त्रियांसाठी उघडली. समाज प्रबोधन, जनजागृती  नवी उत्क्रांतीची नवी वाट सावित्रीबाई फुलेंनी उघडली आणि स्त्रीची परिस्थीती बदलायला सुरूवात झाली. स्त्री शिकली परंतू तिच्यावर अन्याय अत्याचार सुरूच होता तिला बदलायला कायदा सुव्यवस्था आणि संविधानाचा खुप मोठा आधार झाला आणि आजच्या स्थितीला स्त्रीने सर्वक्षेत्रात पदार्पण केल्याने ती पुर्वीसारखी अबला न राहता सबला झाली. आज सर्व क्षेत्रात तिने स्वत:च्या कतृत्त्वाने पुरूषांच्या खांदयाला खांदा लावून यशस्वी वाटचाल करतांना दिसते.

स्त्री आणि पुरूष हे एका रथाचे दोन चाक आहे. यातील एकही चाक बिघडले तर रथ निकामी होईल. त्याचे महत्त्व राहणार नाही. त्याचप्रमाणे नारी विना पुरूष जीवन अपूर्ण आहे. कारण नारी सृजनशिलतेची शिल्पकार आहे म्हणून तिला 'जगत जननी' म्हणून आपण संबांधतो. ती जशी रणभुमीवर युध्द खेळली तशी आजची स्त्री युध्दभूमीवर परमाणू अस्त्र शस्त्र वापरू शकते, मिसाईल तयार करते तर राजकारणातही खुप मोठे निर्णय घेऊन देश चालवू शकते. म्हणूनच आपण तिला म्हणतो– 'स्त्री शक्ति तुला नमन'.

# महिलांनो...
# कायदा तुमच्यासाठी !



अॅड.सुचिता पी. सिसोदिया
हायकोर्ट औरंगाबाद,

**१) महिलांचे असभ्य प्रदर्शन (प्रतिबंधक) कायदा, १९८६**

या कायद्यान्वये महिलांचे असभ्य प्रदर्शन - जाहिरात, प्रकाशने, लिखाण, चित्रे, शिल्प किंवा अन्य कुठल्याही माध्यमातून - करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा कायदा २३ डिसेंबर १९८६ रोजी अस्तित्वात आला. जम्मू-काश्मीर राज्य वगळता, तो संपुर्ण भारतात लागू आहे.

या कायद्याअंतर्गत दोषी आढळल्यास दोन हजार रूपये दंड आणि / किंवा दोन वर्षापर्यंत कारावास अशी शिक्षा होऊ शकते.

**२) वैद्यकीय गर्भपात कायदा, १९७१ :-**

वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१ मध्ये लागू करण्यात आला . त्यात सन २००२ मध्ये सुधारणा करण्यात आली. देशामध्ये सुरक्षित व कायदेशीर गर्भपात सेवा पुरविण्यासाठी आराखडा बनविण्यात आला.

**वैद्यकीय गर्भपात कायद्याची ठळक वैशिष्ट्ये:-**

* वैद्यकीय गर्भपात कायद्याकरिता गर्भावस्था मर्यादा

*भारतामध्ये कायदेशीर गर्भपातास २० आठवड्यांपर्यंत मान्यता

**वैद्यकीय गर्भपात कायदा :-**

वैद्यकीय गर्भपात कायद्यानुसार डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार खालील कारणांमुळे वैद्यकीय गर्भपात करता येतो.

* गर्भवती मातेच्या जीवाला धोका असल्यास किंवा गर्भवती मातेला मानसिक किंवा शारीरिक आरोग्यास गंभीर इजा, दुखापत होत असल्यास.

*नवजात बालकास जन्मानंतर मानसिक किंवा शारीरिक व्यंग असल्यास त्यामुळे बालकास अपंगत्व येणार असेल तर.

* महिलेला/ कुमारीकेला बलात्कारामुळे गर्भधारणा झाली असेल, तर गर्भपात करता येतो (महिलेच्या मानसिक आरोग्याला जबर धक्का बसल्याचे गृहीत धरून )

*विवाहित महिलेकडून किंवा तिच्या पतीकडून गर्भनिरोधक साहित्याच्या / औषधाच्या निष्क्रियतेमुळे गर्भधारणा झाल्यास.

वैदकीय गर्भपात कायद्यानुसार २० आठवडायंपर्यंत स्त्रीरोग व प्रसुतीतज्ज्ञ गर्भपात करू शकतात. इंडियन मेडिकल कौन्सिल कायदा, १९५६ यात सांगितल्याप्रमाणे, नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक, ज्यांच्याकडे मान्यताप्राप्त संस्थेची वैद्यकीय पदवी (अर्हता) धारण केलेली. असावी.ज्यांचे नाव स्टेट मेडिकल रजिस्टरमध्ये समाविष्ट आहे आणि ज्यांना स्त्रीरोग या विषयात काम करण्याचा अनुभव आहे किंवा प्रशिक्षण पुर्ण केले आहे, असे प्रशिक्षित डॉक्टर गर्भपात करण्यासाठी पात्र समजले जातात.

स्त्रीरोग आणि प्रसुतिशास्त्र या विषयात काम करण्याचा सहा महिन्यांचा अनुभव .

सर्व सुविधा असलेल्या शासकीय दावाखान्यात एक वर्ष काम करण्याचा अनुभव .

एमबीबीएस डॉक्टर १२ आठवड्यांपर्यंत गर्भपात करू शकतात. इंडियन मेडिकल कौन्सिल कायदा १९५६ या कायद्यात सांगितल्याप्रमाणे असा नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक, ज्यांच्याकडे मान्यताप्राप्त संस्थेची वैद्यकीय पदवी (अर्हता) धारण केलेली असावी व ज्यांचे नाव स्टेट मेडिकल रजिस्टरमध्ये समाविष्ट आहे आणि केंद्र सरकारच्याच्या अटींनुसार यशस्वीरीत्या प्रशिक्षण पुर्ण केलेले असावे.

(एमटीपी कायद्यानुसार एएनएमएस, स्टफ नर्स, प्रशिक्षित दाई किंवा इतर अप्रशिक्षित व्यक्तींना गर्भपात परवानगी नाही. असे असले तरी ते समुदेशन, प्रसुतिपूर्व गर्भपाताची काळजी घेणे आणि तदनुसार गर्भपात करण्यास संदर्भ सेवा देण्याचे काम करू शकतात).

वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१ अंतर्गत शासन मान्यताप्राप्त असलेल्या गर्भपात केंद्रातच गर्भपात करता येतो. गर्भपाताच्या सुविधा असलेल्या शासकीय दवाखान्यामध्ये गर्भपात करता येतो, त्यासाठी वेगळी परवानगी घेण्याची गरज नाही.

किंवा एमटीपी सेंटरच्या जागेसाठी (नर्सिंग होम/खासगी दवाखाना/ अशासकीय संस्था ) यांना जिल्हास्तरीय समिती / जिल्हा शल्य चिकित्सकांची मान्यता, परवानगी घ्यावी लागते.

**कायद्याचे उल्लंघन केल्यास शिक्षेची तरतुद -**

वैद्यकीय गर्भपात कायदा करणारी कोणतीही व्यक्ती, ज्याची नोंदणी वैद्यकीय व्यावसायिक म्हणून नाही त्यास कमीत कमी दोन वर्षे आणि जास्तीत जास्त सात वर्षांपर्यंत सक्तमजुरीस होऊ शकते. गर्भपात करणारी कोणतीही व्यक्ती जिच्या जागेस मान्यता नाही, अशा व्यक्तीला कमीत कमी दोन वर्षे आणि जास्त सात वर्षापर्यंत सक्तमजुरी होऊ शकत.

मान्यता नसलेल्या जागेचा मालक, जेथे गर्भपात केला जातो , अशा व्यक्तीस कमीत कमी दोन वर्षे आणि जास्त सात वर्षापर्यंत सक्तमजूरी होऊ शकते. ( महिलेचा जीव वाचविण्यासाठी नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाकडून गर्भपात केला असेल व जागेची मान्यता नसेल. नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाकडे आवश्यक असलेली गर्भपात करण्याकरिता कायदेशीर पुर्तता केली नसेल तर अशी व्यक्ती शिक्षेस पात्र ठरत नाही.

**३) हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१**

हा कायदा २० मे ६१ रोजी अस्तित्वात आला– हुंडा या शब्दाची व्याख्या :– लग्न करताना दोन्ही बाजूपैकी कोणत्याही बाजूने दूसऱ्या बाजूला देऊ केलेले पैसे, संपत्ती किंवा अन्य कुठल्याही प्रकारची स्थावर व जंगम मालमत्ता.

अ) एका बाजूने दुसऱ्या बाजूस देऊ केलेली, किंवा

आ) वर व वधू या दोन्ही बाजूंपैकी एका बाजूच्या पालकांनी दुसऱ्या बाजूस देऊन केलेली किंवा आश्वासित केलेली, लग्न होण्याआधी दिलेली किंवा लग्न झाल्यावर देणार असलेली कुठलीही संपत्ती, रोख पैसे, मालमत्ता. (मुस्लिम शरिया कायद्यात येणारे ‘मेहेर ’अपवाद)

शिक्षेची तरतूद : हुंडा प्रकारणी दोषी ठरल्यास पच वर्षे कारावासाची शिक्षा देण्याची तरतूद आहे. या शिवाय १५ हजार रूपये दंड आणि / किंवा हुंडा म्हणून दिलेली रक्कम यांपैकी जी जास्त असेल ती.

**४) गर्भधारणा पुर्व आणि जन्मपुर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायदा, १९९४ :-**

कायद्याची प्रमुख वैशिष्ट्ये

* गर्भधारणेपुर्वी आणि नंतर लिंगचाचणीवर बंदी अहे.

* भ्रुण लिंगपरीक्षणासाठी किंवा परीक्षणासाठी तंत्रज्ञान वापराच्या जाहिरातीवरही बंदी आहे. यामध्ये इंटरनेट माध्यमाचा समावेश आहे.

* फॉर्म-एफ सह विहित नमुन्यात संबंधित माहिती संकलन आणि माहितीच्या रेकॉर्डचे संवर्धन बंधनकारक आहे.

**काही प्रकरणांमध्ये सशर्त अनुमती :-**

काही विशिष्ट प्रकरणांमध्ये गर्भनिदानाला सशर्त अनुमती देण्यात आली आहे. त्यात प्रामुख्याने आनुवंशिक विकलांगपणाची शक्यता, लिंगाविषयक रोग यांचा समावेश आहे. तसेच ज्या माहिलेचे वय ३५ वर्षाहुन अधिक आहे, जिचा दोनपेक्षा अधिक वेळा गर्भपात झाला आहे किंवा गर्भवती महिलेला रेडिएशन, संसर्ग अथवा रासायनिक बाधा झाली आहे, तर अशा प्रकरणांत संबंधित सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांच प्रमाणपत्र असल्यास सशर्त गर्भनिदानास अनुमती देण्यात येते.

केंद्रावर गुन्हा :- गर्भजलाचाचणी, आठ आठवडयांचा गर्भ ( ५६ दिवस) व अर्भकाच जन्म या तिन्ही स्तरांवर या कायद्याव्दारे लक्ष ठेवले जाते. सर्व सोनोग्राफी सेंटर, जेनेटिक कौन्सिलिंग सेंटर आणि लॅबोरेटरी या कायद्याचा कक्षेत आणून त्यांना नोंदणी बंधनकारक करण्यात आली आहे. त्यांची देखरेख करणे व तपासणी करणे याचा त्यात समावेश आहे. या केंद्रांनी कायद्याचा भंग केला, तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे.

**शिक्षा कोणाला ? :-**

* या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या केंद्रावर व डॉक्टरांवर तसेच त्याची सेवा घेणाऱ्या कुटूंबांवरही गुन्हा दाखल होऊ शकतो.

* गर्भवती महिलेची गर्भनिदान चाचणी करण्यासाठी सोनोलॉजिस्ट, अल्ट्रासॉनिक क्लिनिक अथवा लॅबोरेटरी वापर करणाऱ्या व्यक्तीला, स्त्रीरोगतज्ज्ञ किंवा डॉक्टरला पहिल्या गुन्ह्यासाठी तीन वर्षांपर्यंत शिक्षा आणि ५० हजार रूपये दंडाची तरतूद आहे.

* भारतीय पुरावा कायदा , १८७२ मधील तरतुदीचाही याठिकाणी वापर केला आहे. या कायद्याच्या कलम २४ नुसार महिलेला तिचा पती अथवा नातेवाईकांनी गर्भनिदान चाचणीसाठी सक्ती केल्याचे गृहीत धरण्यात आले आहे. त्यामुळे गर्भनिदान चाचणीसाठी प्रवृत्त करणाऱ्यांवरही फौजदारी खटला भरण्याची तरतूद आहे. कलम २५ नुसार कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या अशा व्यक्तींवर तीन महिन्यांची शिक्षा व दंड ठोठवण्याची तरतूद आहे.

* हा गुन्हा दखलपात्र, अजामीनपात्र व दंडात्मक आहे. अशा प्रकरणात सदहेतूने कारवाई केली गेली, तर अशा परिस्थीतीत काराई करणयाऱ्या पोलिसांवर खंटला भरता किंवा दावा दाखल करता येणार नाही.

**कायद्यांतर्गत शिक्षेची तरतूद :-**

* डॉक्टर्स / रूग्णालयाच्या मालकांसाठी

* प्रथम केलेल्या गुन्ह्यासाठी तीन वर्षांसाठी कारावास आणि १० हजार रूपयांपर्यंत दंड

* दुसऱ्यावेळी केलेल्या गुन्ह्यासाठी पाच वर्षापर्यंत कारावास आणि ५०हजार रूपयांपर्यंत दंड.

* आरोप निश्चित झाल्यांनत डॉक्टरांच्या वैद्यकीय परवान्याचे निलंबन.

* प्रथम केलेल्या गुन्ह्यासाठी राज्य वैद्यकीय परिषदेव्दारा पाच वर्षासाठी वैद्यकीय परवाना रद्द करणे.

* त्यानंतर केलेल्या गुन्ह्यासाठी वैद्यकीय परवाना कायमचा रद्द करणे.

* गर्भवती महिलेचा पती / कुटूंबातील इतर सदस्य किंवा इतर व्यक्तींकडून लिंग चाचणी करण्यासाठी प्रेरित केल्यास -

*प्रथम केलेल्या गुन्ह्यासाठी तीन वर्षापर्यंत कारावास ५० हजार रूपयांपर्यंतचा दंड.

* त्यानंतर केलेल्या गुन्ह्याला पाच वर्षांपर्यंतच्या कारावास आणि एक लाख रूपयां पर्यंतचा दंड.

* जो पर्यंत गुन्हा सिध्द होत नाही. तो पर्यंत गर्भवती ही निर्दोष असल्याचे मानले जाईल.

* राज्यस्तरावर हेल्पलाईन - १८००२३३४४७५.

* तक्रारीची सुविधा - www.amchimulgi.gov.in .

मराठी मासिक
शिक्षणयात्री

हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले. संपादक -शैला नंदकिशोर हजारे Reg No. MAHMAR2015/67226



जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

**सौ.हर्षालीदेवी रविंद्रसिंग देशमुख**



लोकनियुक्त : सरपंच

आमोदे ता.शिरपूर जि.धुळे




जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !



**सौ.मनिषा देवेंद्र पाटील**

लोकनियुक्त : सरपंच, करवंद ता.शिरपूर जि.धुळे

CHHOTU KOLHAPURI



यशस्वीतेची दोन वर्षे... खवय्यांची अस्सल पसंती...

**छोटू™ कोल्हापुरी**




Vada Pav













**वाढदिवस,विवाह समारंभ,इतर प्रसंगी ऑर्डर स्विकारल्या जातील...**

**आपली ऑर्डर अवघ्या काही मिनिटातच तयार...**

प्रो: उमेश किसन पाटील

वेळ : सकाळी ८.३० ते रात्री १० पर्यंत अखंड आपल्या सेवेत

पत्ता : करवंद नाका, शिरपूर जि.धुळे संपर्क :९८५०९३८१०५/७०२००७८९८१

Reg No. MAHMAR2015/67226

शिक्षण यात्री Postal Registration No.DHL/557/2018-20


SIP abacus©
success assured



# EXAM time!


## Most important skills to do well:

concentration | retention-recall

visual memory | confidence

...with an active & relaxed brain

**SIP ABACUS**
improves these learning skills



**BRAIN GYM**
helps Relax . Activate . Energize

So, don't miss SIP **abacus** classes during **EXAM** time

Perfect Acadamy,
12, Subhash colony ,
SHIRPUR

www.sipabacus.com
www.sipamal.com

call 9673356999
For more details


प्रेषक
संपादक -२९,क्रांतीनगर,१ली गल्ली,
शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
भ्रमणध्वनी : ८२०८३०१००१

प्रती, ..................................................
..................................................
..................................................

Pragati Arts Shirpur 8421356261